


॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

मासिक

# शिक्षण यात्री

▪ वर्ष:४ थे ▪ अंक: ४ था ▪ सप्टेंबर २०१९ ▪ किंमत:३० रूपये

हेरंब कुलकर्णी लिखित...

**गुरूजी** गेले वाहून,

**सर** आले धावून....

**अवश्य वाचा**

# मी आणि आम्ही...

किमया अशीच केली, लीलयाच या करांनी
केली माझीच पारध, आमुच्याच पारध्यांनी ॥धृ॥

मी शापित पीडितांनी, मी शोषित शोषितांनी
दमछाक माझी केली, आमुच्याच पावलांनी ॥१॥

फोडला असा टाहो, जनहो मला वाचवा हो
केले मिळुनी गारद, आमुच्याच गारद्यांनी ॥२॥

बंडाळी उभारली, निळी हिरवी लाल निशाणी
झेंड्यास मांड दिली, आमुच्याच बांधवांनी ॥३॥

आप्त स्वकीयांना मस्ती, प्राशुनि घाम आली सुस्ती
सागरा उधान आणिले, आमुच्याच आसवांनी ॥४॥


त्रिभेस माझ्या नाही धार, कंठशोष हा झाला फार
पुन्हा पुन्हा छेडिली तार, आमुच्याच नारदांनी ॥५॥

थकल्या भागल्या जीवास, आवडू लागे एकांतवास
पाठलाग माझाच केला, आपुल्याच सावल्यांनी ॥६॥

- डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से.)



अक्षरचित्र-विष्णू थोरे



# पत्रास कारण की,

आदरणीय गुरूजी,

सा.न.वि.वि.

प्रथमत: आपणाला शिक्षक दिनाच्या शुभेच्छा.

कसंय, आपल्या सन्माना आम्हीही तत्पर! बरे. आम्हाला सुद्धा घडवलं गुरूजींनीच. पाठांतर नि छडी या समीकरणातूनच आमचे शिक्षण झाले. बे एके बे पेक्षा पावकी दिडकी पाठ करण्यात काय मज्जा? नि टेबलावर हात ठेऊन रूळाची छडी घेण्यात काय आनंद? आठवलं तरी अंगावर काटा येतो. आता मात्र शाळातून पाठांतर हद्दपार झालेलं दिसतयं.

जसा शिक्षणाचा प्रवास वळणावळणातून होत गेला तसा मात्र गुरूजींचा झाला नाही. गुरूजी-मास्तर-सर असा सरळ रेषेतच गुरूजींत बदल झाला. आणि हो, गुरूजी मंडळीचा स्वभावच मुळी सरळ चालण्याचा. वाट वाकडी करून कशाला उगाच खाज करून घ्यायची? साहेबापुढं चालू नये नि गाढवा मागं राहू नये' याप्रमाणेच आजच्या सरांनाही एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे 'सकारात्मक' संदेश मिळतोय. पण जुन्या गुरूजींच्या काळातील कामांची यादी मात्र आताच्या सरांकडे येतांना लाबतच आली. या कामातील १००% पटनोंदणी उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण हे तीन शब्द मात्र अनादी काळापासून चिकटलेलेच आहेत. गुरूजी ते सर सारेच या शब्दाला स्टीक अप. या तीन शब्दांभोवती सारा शिक्षण गोतावळा जमलाय. इतर कामांची यादी तर पहायलाच नको. नेमके गुरूजी-सर कशासाठी? हेच कळतं नाही.

असो. सर, मानलं तुम्हाला नि तुमच्या संघटनांना एकच दिवसाचा संप पण धडकीच भरवली ना सरकारला. जुनी पेन्शन व इतर मागण्यासाठी आपला एकाच दिवसाच्या संपाला १०० % प्रतिसाद मिळाला बरं. जुन्या काळात साधारणता १९७२ साली गुरूजी मंडळींचा महिना दोन महिना संप चाललेला. नंतर कधी गुरूजी इतके इरेला पेटतील असे वाटते नाही. मात्र जुन्या पेंशन योजनेच्या मागणीसाठी सरांनीसुद्धा जुन्या गुरूजी एवढेच कणखर असल्याचे दाखवून दिले. एक मात्र खरं, शिक्षकांच्या संघटना इतक्या पॉवरफुल संघटना इतर कुठल्याही नसाव्यात. गाव पुढाऱ्यांपासून जिल्हा पुढाऱ्यांपर्यंत सारेच जण गुरूजी-सरांपासून धास्तावलेले असतात असं म्हणतात.

सर, आपल्या सरकारनं मुख्यालयी रहाण्याचा ग्रामसभेचा ठराव मागितलाय म्हणे. समस्त गुरूजी मंडळीच हे जुनं दुखणं मात्र ओल्या जखमेसारखं आहे. काही काळ शांत तर मध्येच मुख्यालयी रहायचे फर्मान. मुख्यालयी रहा नाहीतर घरभाडे भत्ता बंद. यावर जालीम इलाज नाही का? जुने गुरूजी गावात रहायचे. तो काळ नि आजची परिस्थिती पार बदललीय. मुलं शिकली पाहिजेत हाच उद्देश आहे नां. मग तो तालुक्याच्या ठिकाणी राहुनही साध्य होईल ना. कशाला उगाच ग्रामसेवक पुढारी यांच्या मिनतवाऱ्या करायला लावताय? आपलं तर सरळ म्हणणं आहे कि सरांनी दोनशे किलोमीटर वरनं ये-जा करावी पण शाळेच्या वेळेत यावं-जावं, मुलांना वाचत लेखन शिकवावं नव्हे वाचता लिहता यावं. बस्स

बरोबर आहे ना सर! तुम्ही मंडळी ना, माझ्या पत्राला उत्तरच देत नाही. प्रतिक्रिया पाठवत नाही. असा एकतर्फी संवाद नको. दुहेरी संवाद झाला पाहिजे. मी तर नेहमीच आपल्या प्रतिक्रियांची वाट पहातो.

चला आता परिक्षांचा काळ. दिवाळी जवळ येऊ लागलीय. महिनाभराचा अवधी नंतर हिवाळी सुटीचा आनंद. मजा आहे सर तुमची.

तुमच्या पत्राची वाट पहातो.

आपलाच

हितचिंतक 'संदेश'


**शिक्षकांचे हक्काचे व्यासपीठ**

▸ वर्ष : ४ थे

▸ अंक:४ था ▸ सप्टेंबर २०१९

• संपर्क •

शिक्षणयात्री

क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे

चलभाष : 8208301001

shikshanyatri11@gmail.com

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

• सह संपादक •

सुभाषदादा कुलकर्णी

• मुखपृष्ठ •

महेश थोरात प्रस्तुत 'मास्तर'

चित्रपटातील नायक सचिन जाधव (शिरपूरकर)

• मांडणी •

प्रगती आर्टस्,शिरपूर ९४२२२३३२९४

लेखात व्यक्त झालेली मते

लेखकांची व्यक्तिगत समजावी

• कायदेशीर सल्लागार •

ॲड.शाम पाटील

पी.आर.बी.ॲक्टनुसार कायदेशीर

जबाबदारी कार्यकारी संपादकांवर.


टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.



# गुरूजी गेले वाहून, सर आले धावून

**हेरंब कुलकर्णी**
शिक्षक,लेखक व कार्यकर्ता
अकोले जि.अहमदनगर
herambkulkarni1971@gmail.com

गुरुजी कुठे गेले आणि सर कुठून आले ? ही चर्चा करताना आपल्याला गुरुकुलातल्या ऋषीपासून आजच्या online शिक्षक इथपर्यंतचा आढावा घ्यावा लागेल. गुरुकुलातल्या शिक्षकाचे जीवन,भावविश्व हे एकच होते. दोघेही एकत्रच राहत होते. सकाळपासून झोपेपर्यंत शिक्षक शिक्षकाचे कुटुंब आणि विद्यार्थी हे सारे एकत्रच राहत होते..त्या काळापासून आज आपण online पर्यंत आणि शिक्षक नसण्यापर्यंत आपण प्रवास केला आहे. थोडक्यात जसजशी मानवी प्रगती होत गेली तसतसा शिक्षकाचा रोल हा मर्यादित होत गेला. आयुष्यात पूर्णवेळ शिक्षक असण्यापासून तर काही काळ शिक्षक असण्यापर्यंत हे आकुंचन होते आहे.

गुरुकुल परंपरा संपली , नंतर खेडेगावात शिक्षक आणि विद्यार्थी पहाटेपासून रात्रीपर्यंत एकत्रच असत.शिक्षक आणि मुले जरी वेगवेगळे राहिली तरी रात्री मुले शाळेत झोपायला येत.शिक्षक त्यांना पहाटेच अभ्यासाला उठवत असत. पहाटे उठले की कंदिलाच्या उजेडात शिक्षक मुलांना जागवत. सकाळी व दुपार सत्रात शाळा चालत असत. संध्याकाळी खेळ आणि रात्री मुले पुन्हा शाळेत झोपायला.गुरुकुल थोडे पातळ झाले. यात ते शिक्षक त्या गावात राहत होते.त्या गावात राहताना ते शिक्षक त्या गावाचे भाग बनलेले असत..ते शिक्षक त्या खेड्याचे शहाणपण असत.त्या खेड्यातील लग्नाच्या बैठका त्या शिक्षकाशिवाय होत नसत. गावात कोणी आजारी पडले तर हाच शिक्षक झाड पाल्याचे औषधे देत असे. कुणी पेशंट गंभीर झाला तर त्याच्यासोबत तालुक्याला जात.गावातील सारी भांडणे याच्या शिवाय मिटत नसत.शिक्षक हेच भाऊबंदकीच्या भांडणात कोर्ट होते. शिक्षक त्याच नोकरीच्या गावात राहत असे.त्यांची मुले त्यांना आमच्यासारखी खाजगी शाळेत तालुक्याला शिकविणे शक्य असूनही त्यांनी गावातच शिकवली.या शिक्षकांनी आपल्या कुटुंबाला तालुक्याच्या गावी ठेवणे शक्य असूनही नोकरीच्या त्या खेड्यात तमाम गैरसोयी झेलत फिरवले..त्यांच्या बायकांनीही त्याबाबत तक्रार केली नाही. 'पिंजरा' चित्रपटातील दाखवलेला पूर्वार्धातील मास्तर म्हणजे हा शिक्षक होता. बनगरवाडीत रंगवलेला आणि 'माझी काटेमुंढरीची शाळा' या पुस्तकातील नायक हे जणू त्या पिढीच्या शिक्षकाचेच वर्णन आहे. आजचा शिकलेला महाराष्ट्र या अशा गुरुजींच्या खांद्यावर उभा आहे. या शिक्षकांनी केलेल्या समर्पणावर आजचा महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य झाला आहे. केवळ याचे श्रेय हरित क्रांती आणि औद्योगिक क्रांतीला नाही हे लक्षात घेण्याची गरज आहे. या गुरुजींचे शिक्षण कमी होते पण त्यांच्यातील समर्पणाने त्यांच्या त्या मर्यादेवर मात केली.आज ज्या शिक्षकांचे नंबर मेडीकल इंजिनियरिंगला लागू शकले असते अशी मुले प्राथमिक शिक्षक झाली आहेत.तर दुसरीकडे लिहिता वाचता न येणाऱ्या मुला मुलींची संख्या वाढते आहे. याउलट मागच्या पिढीत शिक्षक अतिशय कमी शिकलेले होते.ते इंग्रजीही शिकलेले नसत पण धोतर,कोट,टोपी घालणारे ते शिक्षक 'देवा तुझे किती सुंदर आकाश' ही प्रार्थना म्हणत दिवस सुरू करत आणि हातात घड्याळ नसलेली ती माणसं रात्री मुले झोपेपर्यंत कामच करत राहत .तेव्हाची ती तळमळ ही आजच्या या हुशार मुलामध्ये कशी आणायची..? कोणी संक्रमित करायची? पण त्याच जुन्या शिक्षकांच्या हाताखालीच मुले खऱ्या अर्थाने घडली.. हे असं का घडतयं ?ही विसंगती कशी समजून

घ्यायची...??

हळूहळू शिक्षणाचे सार्वत्रीकरण झाले.'गाव तिथे एसटी' आणि गाव तिथे शाळासुद्धा आली. एकागावातला आयुष्यभर राहणारा शिक्षक हे चित्र बदलून गेलं. सरकारने नेमलेले शिक्षक गावोगावी आले.गावाचे आणि शाळेचे, गावाचे आणि शिक्षकांचे नातेच बदलून गेले. जसा गावात ग्रामसेवक बदलून यायचा,जसा गावात आरोग्य कर्मचारी बदलून यायचा ,जसा गावात तलाठी यायचा तसा आता शिक्षक ही येऊ लागला. परगावाहून दूर जिल्ह्यातून तो येऊ लागला. कोकणात आणि विदर्भात स्थानिक शिक्षक अपेक्षित अर्हता धारक नव्हते त्यामुळे बाहेरच्या जिल्ह्यातून शिक्षक तिथे जाऊ लागले आणि ज्या दिवशी हजर झाले त्या दिवसापासून बदलीचा प्रयत्न करू लागले. बदली होऊन आलेल्या शिक्षकाचे नकळत कर्मचारीवर्गात रुपांतर झाले. त्यात पुन्हा नोकरीच्या गावात राहण्याची गैरसोय बघून आणि मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षक मोठ्या गावात राहू लागले. तालुक्याच्या गावी मोठ्या संख्येने शिक्षक राहतात. त्यातून जुनी गुरुजींची प्रतिमा बदलून गेली. त्यातून गावाशी शिक्षकांचे नाते मर्यादित झाले.शिक्षक जेव्हा गावात येतात तेव्हा गावकरी शेतात कामाला गेलेले असतात आणि गावकरी संध्याकाळी गावात येतात तेव्हा शाळा सुटून गेलेली असते आणि शिक्षक तालुक्याला गेलेले असतात. त्यातून गावाशीअसलेले त्याचे नाते हे मर्यादित झाले. पूर्वी गावाचे शहाणपण असलेला हा शिक्षक आता फक्त गावातील एक कर्मचारी उरला. त्याला आणखी एक पैलू होता. गावपातळीवर राजकारण गटबाजी वाढली. गावाची शाळा ही त्यातून सुटेना. या वाढत्या राजकारणात गावातील राजकारणापासून शिक्षक शांत राहीले...त्याच्या लक्षात आले की आपण सुखाने नोकरी करण्यासाठी आपण आता गप्प राहिलो पाहिजे.त्यातून शिक्षक गावातीलभानगडीपासून गप्प राहिले किंवात्यांनी सुटका करून घेतली.

शिक्षकांनी आपली सुटका फक्त केवळ गावातील राजकारणातूनच करून घेतली नाही..तर सामाजिक चळवळीतून स्वत:ची सुटका करून घेतली आहे. आज शिक्षक समुदायाबद्दल जे प्रश्न उपस्थित केले जातात त्याविषयी बोलले पाहिजे. महाराष्ट्रात एक काळ असा होता की सर्व सामाजिक चळवळी सांस्कृतिक चळवळी यात शिक्षक वर्गाने पुढाकार घेतला.अनेक चळवळींचे नेतृत्व शिक्षकच करीत होते.याचे एक कारण जे जे शिक्षक होते ते ते सारे एका ध्येयवादाने शिक्षक झालेले होते.त्या ध्येयवादाने हे सारे शिक्षक सामाजिक चळवळीत सामील होत होते. साने गुरुजींच्या प्रेरणेने आणि स्वातंत्र्यचळवळीच्या प्रभावातून महाराष्ट्रात हजारो तरुणांनी शिक्षक होण्याचे ठरविले. हे तरुण उच्च अधिकारी होऊ शकले असते किंवा कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकले असते.पुन्हा शिक्षक होण्यात त्या काळात आर्थिकआकर्षण अजिबात नव्हते तरीही तो विचार त्यांनी केला नाही. साने गुरुजींची 'धडपडणारी मुले' म्हणून असे शिक्षक ओळखले जात होते. अशा शिक्षकांनी शाळेतही उत्तम शिकवले आणि सामाजिक कार्यातही ते सहभागी झाले.नरहर कुरुंदकर,राम शेवाळकर,ना.य.डोळे असे अनेक शिक्षक त्याआर्थाने प्रसिद्ध आहेत. पण आज शिक्षक सामाजिक कार्यात भाग घेत नाहीत,चळवळीचे नेतृत्व करीत नाहीत याचे कारण ते मुळातच त्या जुन्या ध्येयवादातून शिक्षक झालेले नाहीत.त्यामुळे ते तसे नाहीत. शिक्षकांच्या बांधिलकीवर टीका करताना ही शिक्षकांची भरती कशी झाली ?हे लक्षात घेतले पाहिजे.

आज शिक्षकांवर मोठ्या प्रमाणात टीका केली जाते.शिक्षक केवळ आर्थिक विचार करतात.शिक्षक ज्ञानसाधना करत नाहीत.इतर व्यवसाय करतात.व्यासंग करीत नाहीत असे अनेक आरोप केले तर त्यांच्या वर्तनावर टीका केली जाते.पणत्यातील अनेक शिक्षक या प्रकारच्या ध्येयवादाने शिक्षक झालेले नव्हते हे लक्षात घेतले पाहीजे. महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. एक लाखापेक्षा जास्त प्राथमिक शाळा, २० हजारपेक्षा जास्त माध्यमिक शाळा,शेकडो कॉलेज आणि तितक्याच गावोगावी निघालेल्या व्यवसाय शिक्षणाच्या संस्था. यामुळे मोठ्या प्रमाणात शिक्षक नोकऱ्या उपलब्ध झाल्या. या नोकरीसाठी आवश्यक असणारी डीएड,बीएड कॉलेज २००० च्या दशकात प्रत्येक तालुक्या तालुक्यात निघाली. अगोदरच शेतीत रोजगाराच्या नाही.व्यवसाय करावे तर ग्रामीण भागात मार्केट नाही ,बँक भांडवल देत नाही आणि मार्गदर्शन नाही. पुन्हा मराठी मनाचा कल हा जोखीम घेण्याचा नाही. आणि प्रत्येक तालुक्यात महाविद्यालय निघाल्याने किमान १२ वी किंवा पदवीधर मुले सहजपणे झाली व त्यांनी हक्काची शिक्षकाची नोकरी मिळेल म्हणून डीएड बीएड करायला सुरुवात केली. अनेकांना नोकरी मिळू लागल्याने डीएड बीएड चा बाजार वधारला आणि त्यात डोनेशन सुरु

झाले. इमारत धड नाही. प्रशिक्षित शिक्षक स्टाफ नाही. अशा स्थितीत डीएड बीएड सुरु झाले .यातील शिक्षणसम्राटांनी या मुलांचे शोषण केले. अनेक पालकांनी जमिनी विकल्या अशी उदाहरणे होती. ज्या महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नीने गळ्यातले मंगळसूत्र मुलांसाठी गहाण ठेवले त्याच महाराष्ट्रात शिक्षणसम्राटांनी मुलांच्या आईला गळ्यातील मंगळसूत्र विकायची वेळ आणली.पुन्हा अशा संस्थातून शिक्षक झालेल्यांना नोकरीसाठीही पैसे मोजावे लागले. खाजगी शिक्षणसंस्थांनी जातवार राजकीय सोयीनुसार शिक्षकभरती केली. तीभरती करताना त्यांनी हायस्कूल व महाविद्यालयात शिक्षक भरताना लाखो रुपये घेतले. तेव्हा डीएड बीएड च्या नोकरीला डोनेशन आणि आता नोकरीसाठी ही पैसे. पुन्हा शासकीय मान्यतेसाठीही पुन्हा लाच. अशा आर्थिक नाडलेल्या शिक्षक तरुण तरुणीत ध्येयवाद उरला नाही. अशा कालखंडात शिक्षक म्हणून लागलेले शिक्षक हे अति व्यावहारिक झाले. त्यांना ध्येयवाद वगैरे शब्द हे चेष्टेचे विषय वाटायला लागले. ते थट्टा करू लागले. या आर्थिक ध्येयशून्य लाचखोरीच्या पुरात गुरुजी वाहून गेले आणि सर फक्त उरले…

राजकीय नेत्यांना शिक्षकाविषयी अजिबात आदर नव्हता. त्यांनी शिक्षकांना कायम वस्तु म्हणून वापरले. शिक्षक भरती करताना कोणत्या गावातून किती मते या निकषावर केली. पुन्हा त्यांच्या निवडणूक प्रचारात अगदी पैसे वाटण्यापासून शिक्षकांना कामे करावी लागतात. शिक्षक मुक्कामी अनेक गावी ठेवले जातात. खुनशीने बदल्या केल्या जातात आणि नोकरी लावण्यापासून नेत्याच्या वाढदिवसापासून सतत पैसे मागितले जातात. अशा संस्थातील शिक्षकांना आपण आदर्शवाद सांगणार ?

त्यात पुन्हा शासनाची धोरणे ही शिक्षकातला गुरुजी मारणारीच होती. कोणत्याही सरकारला हाताखाली माणसे नको असतात तर मशीन किंवा पपेट हवी असतात .त्यांना स्वतंत्र्य व्यक्ति नकोच असतात. त्यातून शिक्षकाचे व्यक्तिमत्व एक कर्मचारी म्हणूनच राहील अशी शासनाने काळजी घेतली … शिक्षक हा वेळापत्रक आणि एका चरकात असा बांधला की नकळत त्याचा कर्मचारी होत गेला. कृष्णकुमार म्हणतात त्याप्रमाणे घंटा वाजली की तो वर्गात जातो दुसरी घंटा वाजली की तो बाहेर येतो यातून तो यांत्रिक होतो.पुन्हा शासनाच्या विना अनुदानित धोरणाने तर आज जे कोणी शिक्षक होण्यासाठी या क्षेत्रात आले त्यांच्यातील उर्जाच मारून गेली. १०० आंदोलने करून २० ते २५ वर्षे विना अनुदानित काम करणाऱ्या. शिक्षकांच्या नजरेला नजरही देण्याची हिंमत होत नाही. आज एकाच कामासाठी शाळा महाविद्यालयात दोन प्रकारचे शिक्षक आहेत. एक पूर्णपगारी आणि तासिका तत्वावरील शिक्षक. त्यांनी हे अन्याय झेलताना कसे आदर्श झेलावेत पुन्हा छोट्या छोट्या कामासाठी अधिकारी सतत पैसे मागितले जातात त्यातून शिक्षकातील आदर्शवाद मरत गेला.

पण पुन्हा हे ही अर्धेच विश्लेषण होईल.शिक्षणातला ध्येयवाद मारायला फक्त एवढे एकच कारण नव्हते. हे शिक्षक झालेले हे तरुण तरुणी काही सर्वच आर्थिक झळ बसलेले नव्हते किंबहुना १९९५ पूर्वी नोकरीत आलेल्यांना हा त्रास फारसा झालेला नव्हता. तरीही त्यांच्यातही फारसा ध्येयवाद का नव्हता ? याचीही चर्चा करायला हवी. मुळात हे झालेले शिक्षक यापूर्वी म्हणालो तसे सर्वच काही साने गुरुजी परंपरेच्या ध्येयवादातून आलेले नव्हते..त्यातही पुन्हा महाराष्ट्रातील शिक्षणाचा दर्जा हा यथातथाच होता. शाळेत हे शिक्षक जेव्हा विद्यार्थी होते तेव्हा काही फार ध्येयवाद शिकवला जाईल,मुलांना वाचन करायला, चर्चा करायला, बौद्धिक प्रेरणा दिली जाईल अशा प्रकारचे उपक्रम फार काही घेतले जात नव्हते. जे कृष्णमुर्ती म्हणतात तसे ‘आजचे शिक्षण विचार कसा करावा ? हे शिकवत नाही तर काय विचार करावा हे रेडीमेड शिकवते. ते म्हणतात आजचे शिक्षण what to think शिकवते पण how to think शिकवत नाही.यामुळे शिक्षणाच्या केवळ पाठांतरपद्धतीने शिकलेल्या आणि इतर कोणतेही सामाजिक उपक्रम न शिकलेल्या विद्यार्थ्यांना शाळेतून मार्क मिळाले ,पदव्या मिळाल्या पण कोणताच ध्येयवाद मिळाला नाही. त्यामुळे वाईट शिक्षणातून वाईट विद्यार्थी आणि वाईट विद्यार्थ्यांतून घडणारे पुन्हा वाईट शिक्षक आणि त्यांच्या हाताखाली पुन्हा सुमार विद्यार्थी असे हे दुष्टचक्र आहे. त्यातून एकूण शिक्षणाचा सरासरी दर्जाच खाली आला.

ध्येयवाद सोडाच पण किमान व्यावसायिक बांधिलकी तरी उरावी ना ? पण ती ही घसरत घसरत गेली. दत्ता सावळे नावाचे एक विचारवंत म्हणायचे की १८ वर्षाची एक अल्लड तरुणी लग्न झाल्यावर आई होते आणि तिचे मूल हे मूल म्हणून विकसित होताना तिच्यातील तरुणी ही आई म्हणून विकसित होते त्याप्रमाणे विद्यार्थी हा विद्यार्थी म्हणून विकसित होताना शिक्षक

हा शिक्षक म्हणून विकसित झाला पाहिजे पण आपल्या व्यवस्थेत नोकरीला लागणारा शिक्षक निवृत्त होताना त्याची वैचारिक किंवा इतर कुवत उंचावली असे अजिबात अपवाद वगळता का दिसत नाही ?? नोकरीत माणसे अधिक बनचुकी होत जातात. ती फुलत नाहीत उलट कोमेजून जातात.. आचार्य रजनीश म्हणायचे आज शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या ज्ञानात फक्त एक तासाचे अंतर आहे.तो अगोदर एक तास अगोदर नोट्स वाचतो आणि मुलांना माहिती देतो त्यामुळे त्याने त्या पलीकडे जावून जिज्ञासेचे माध्यम बनले पाहिजे पण हा व्यासंग शाळेतील शिक्षकांचा सोडाच पण महाविद्यालयीन स्तरावरही फारसा उरला नाही. रजनि म्हणतात तशीच बहुतेक ठिकाणी अवस्था आहे.अभ्यासक्रम बदलला तरच नोटस बदलल्या जातात..वर्गात प्रतिभेला स्पर्श करील असे काहीच व्याख्यानात नसते. त्या नोटसच्या आधारेच शिकवले जाते आणि त्याच लिहून दिल्या जातात. त्यामुळे विद्यार्थी ही व्यासंगी होत नाहीत किंवा त्यांना वाचनाची किंवा इतर व्यासंगी आवड लागत नाही. प्राध्यापकांच्या पीएचडी, त्यांच्या conferenceho सारे विषय पुन्हा पुन्हा आपल्याला 'गुरुजी गेले वाहून' याचीच आठवण करून देतात.. तेव्हा कामाचा आणि वेतनाचा परस्पर संबंध नसेल तर शिक्षणाची किती भयंकर अवस्था होते हे महाविद्यालयीन शिक्षणाकडे बघून पटते. प्राथमिक शाळा ते महाविद्यालयीन शिक्षण यात गुणवत्ता घसरण्याचे आणि शिक्षकात शैथिल्य येण्याचे एक महत्वाचे कारण हे आहे की शिक्षकाचे काम मोजण्याची कोणतीच प्रक्रिया शिक्षणात नाही. त्यामुळे 'सब घोडे बारा टक्के' अशी स्थिती झाली आहे. चांगल्याचे कौतुक नाही आणि वाईटाला शिक्षा नाही अशी अवस्था आहे. त्यामुळे चांगले काम करणारा शिक्षकही हळूहळू इतरांसारखा होत जातो. काम आणि वेतन यात जे नाते असायला हवे तेच नसल्याने काम हे मूल्यमापनात महत्वाचे ठरत नाही. त्यातून मग नोकरीत स्थिरावला की मग शैथिल्य येते आणि व्यासंग करावासा वाटत नाही. पुन्हा व्यासंग घटण्याचे आणि काम उत्कृष्ट करावेसे वाटत नाही याचे आणखी एक कारण समोर बसलेला शिक्षणातला ग्राहक असलेला विद्यार्थी हा शिक्षकाचे मूल्यमापन करायला असमर्थ आहे. त्यामुळे इतर व्यवसायात ग्राहकाचे जे दडपण येते तसे शिक्षकावर येत नाही . दुकानदाराने भेसळयुक्त माल विकला तर चर्चा होते आणि टी गिर्हाइक पुन्हा येणार नाही. दुधात पाणी टाकून विकले तर ते दूध नंतर विकले जात नाही कारण ते घेणारे ग्राहक जागृत आहे पण शिक्षणात दूध म्हणून पाणी दिले गेले तरीसुद्धा काहीच फरक पडत नाही कारण ते ओळखाण्याची क्षमता मुलामध्ये नसते आणि ज्या पर्यवेक्षीय यंत्रणेने हे मूल्यमापन करायला हवे, शिक्षकांना मार्गदर्शन करायला हवे ती त्याचे काम रामशास्त्री बाण्याने मूल्यमापन करीत नाही.सगळे एकमेकांना सांभाळून घेतात. गोपनीय अहवाल लिहिले जातात पण ते अहवाल हे केवळ कर्मकांड उरले आहेत. महाविद्यालयीन प्राध्यापकांना तपासायला अनेक निकष आले पण त्या निकषाइतकी ऊंची वाढविण्यापेक्षा ते निकषच पातळ करण्याकडे अनेकांनी लक्ष दिले. आंतरराष्ट्रीय दर्जाची मासिके गल्ली बोळातून निघू लागली,conference हे केवळ महाविद्यालयीन खर्चाने झालेले पर्यटन ठरले आणि नक ची तपासणी हे वार्षिक सेलिब्रेशन ठरले. महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा घसरत गेला आणि पगार मात्र वाढत गेले. माझ्यासकट आमची सारी टीका प्राथमिक शिक्षणावर असते कारण त्या शाळा खेड्यापाड्यात असल्याने सर्वच समाज त्याकडे सूक्ष्मदर्शकातून बघतो, गुरुजी कधी येतो यावर लक्ष ठेवतो पण या महाविद्यालयात कामकाज कसे काय चालते ? हे समाजाला समजत नाही किंवा ते लक्षही देत नाही. त्यामुळे वर्षातील किती दिवस काम चालते ? तास होतात का ? व्यासंग आणि पीएचडी चा दर्जा काय ? conference मधून समाजाच्या हिताची काय चर्चा झाली ? हे समाजाला कळत नाही की समाजही उत्सुक नाही.

'शिक्षक हा दरिद्रीच असला पाहिजे' असा एक शोधनिबंध फारपूर्वी महाराष्ट्रात चर्चिला गेला होता. शिक्षक हा आर्थिकदृष्ट्या सक्षम नसताना समाजाशी खूप जोडलेला होता आणि आता तो जसजसा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाला तसतसा तो समाजापासून तुटून गेला. एक जुने संस्थाचालक पूर्वी शिक्षण संघटनेचे नेते होते. त्यांच्या मृत्यूपूर्वी त्यांचे एक संस्थेतील शिक्षकांसमोर भाषण मी ऐकले. अतिशय व्यथित होऊन ते म्हणाले की संघटनेच्या माध्यमातून आम्ही शिक्षकांचे पगार वाढवा म्हणून संघर्ष केला, शिक्षकांचे पगार बँकेत करा म्हणून शिक्षकाला स्वयंपूर्ण पूर्ण केले पण तीच आज चूक झाली की काय ? असे आता मला वाटते आहे. मला त्यांचे शल्य समजू शकते. संघटनेच्या माध्यमातून शिक्षक नोकरीत स्थिर झाले पण त्या स्थिरतेने समाजाची शिक्षणाची आणि सर्वात

जास्त शिक्षकाच्या स्वत:च्याच विकासाची खूप नुकसान केली. सुरक्षिततेने शिक्षक समूह हा अधिक स्थितीवादी झाला. अधिक व्यासंगहीन झाला आणि आर्थिक स्थैर्याने तर त्याची जगण्याची दिशाच बदलली.. शरद जोशी म्हणतात विचार करायला लावणारे इंद्रिय हे मेंदू नसून खिसा आहे. आर्थिक स्थैर्याने हितसंबंध बदलत गेले. शिक्षकांचे वर्गच बदलून गेले. प्राथमिक शिक्षकांचे तरी पगार अजून तुलनेत कमी आहेत पण प्राध्यापकांच्या पगाराचे काय ? एका तालुक्याच्या किंवा त्यापेक्षा छोट्या गावात असलेल्या ठिकाणी लाखभर रुपयापेक्षा जास्त महिन्याला मिळणारी रक्कम तिथल्या माणसांपेक्षा तुम्हाला एकदम वेगळ्याच रस्त्यावर नेवून उभे करते. त्यातून व्यासंग वाढविण्यापेक्षा इस्टेट वाढविण्यावर भर दिला जातो. पाचव्या वेतन आयोगाचे वेळी कवि रामदास फुटाणे यांनी एक वेगळा मुद्दा मांडला होता. ते म्हणाले होते की ही वेतनवाढ घराघरात फुट पाडणार आहे. शेतकरी भाऊ आणि त्याचा नोकरदार भाऊ यांच्या उत्पन्नातील फरक जसा वाढत जाईल तसे दोघांचे जग वेगळे होऊन जाईल. हितसंबंध बदलतील आणि त्याचा परिणाम त्यांच्या नातेसंबंधावर होईल.आज ती भीती अगदी गावागावात आणि ग्रामीण भागातील घराघरात जाणवते आहे. या वर्गाचे समाजावरचे अवलंबित्व कमी झाल्यामुळे आत्ममग्नता वाढत गेली. बहुजन जातीतून जे शिक्षक झालेले होते त्यांनी त्यांच्या त्यांच्या जात समुहाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावा अशी अपेक्षा होती. पण या नोकरदार असलेल्या वर्गाने स्वत:ला तोडून घेतले आणि शहरी जीवनाचे ते भाग झाले. पूर्वी गावाकडच्या भावाची मुले यांच्याकडे शिकायला असायची.पण ते चित्र आता अपवादाने दिसते आहे. त्या आर्थिक स्थिरतेतून मग गुंतवणूक सुरू झाली. वैचारिक चर्चांची जागा स्टाफरूममध्ये मग शेअर बाजाराच्या चर्चानी घेतली. असे काही बोलले की मग शिक्षकाने काय गरीब राहावे का ? असे विचारले जाते. पण प्रश्न गरीब राहण्याचा नाही तर या आर्थिक स्थिरतेने तो समाजाच्या गरीब वर्गापासून तुटला हे लक्षात आणून देणे हा आहे. त्यातून त्याचे वर्ग बदलले व तो आत्ममग्न होऊन समाजाचे नेतृत्व करण्याची अपेक्षा तो पूर्ण करीत नाही हे आहे.

या सर्व मुद्द्यावर प्रतिवाद असा केला जातो की शिक्षकाकडून तुम्ही आदर्शवादी अपेक्षा का करता ? तो ही याच समाजाचा भाग आहे. याच समाजात आज कोणताच समाजघटक नैतिकतेने वागत नसताना तुम्ही त्याच्याकडूनच का अपेक्षा करता ? त्याची जडण घडण शेवटी या समाजात असलेल्या आजच्या जीवनमूल्यांनीच झाली आहे ना ? हा युक्तिवाद बरोबर आहे. ज्या समाजात नीरव मोदी ,मल्ल्या लूट करून सुखाने जगत असताना राजकारणी व्यक्ति, ठेकेदार हे अप्रमाणिक मार्गाने कोट्यावधी रुपये कमावताना शिक्षकालाच उपदेश का करता ? असे विचारणे योग्यच आहे. पण प्रश्न वेगळा आहे.सगळा समाज जरी बिघडला तरी शिक्षकाला बिघडता येणार नाही कारण हा समाज सुधारायचे उत्तर आणि या गुंत्याची किल्ली हा शिक्षकच आहे. रात्रीच्या वेळी घाटातून गाडी चाललेली असते .सगळे प्रवासी झोपलेले असतात..अशावेळी ड्रायव्हर जर म्हणाला की सगळेच झोपलेत मग मी ही झोपलो तर काय हरकत आहे ? तर ती सर्वांचीच काळझोप ठरेल. ड्रायवर जागा आहे म्हणून तर सर्वजण झोपू शकले . तेव्हा समाज कितीही बिघडला तरी शिक्षकाला बिघडता येणार नाही. शिक्षक हा ते सारे दोष दूर करण्याची क्षमता असलेला नेता आहे.त्यामुळे शिक्षकाच्या अवमूल्यनची किंमत मोठी असते.शिक्षकावर टीका झाली की शिक्षक खूप दुखावतात.आमच्यावर इतकी टीका का होते ?असे ही विचारले जाते पण मी नेहमी म्हणतो जेव्हा जेव्हा शिक्षकावर समाज टीका करतो तेव्हा तेव्हा मला खूप आनंद होतो कारण याचा अर्थ समाजाने अजून शिक्षकवर्गाकडून आशा सोडलेली नाही.समाज राजकारणी काळाबाजारवाले यांच्यावर टीका करीत नाही कारण त्यांच्याकडून बदलण्याची आशाच सोडून दिली आहे पण शिक्षकाकडून समाजाच्या आशा अजून जिवंत आहेत हाच त्याचा अर्थ आहे..त्यामुळे शिक्षकावर जेव्हा समाजाची टीका थांबेल तो दिवस दुखा:चा असेल कारण समाजाने त्यांची आशाच सोडून दिलेली असेल.

तरीही या व्यवस्थेत काही शिक्षक अजूनही गुरुजी मनाचे आहेत त्यावर बोलले पाहिजे अन्यथा हेमूल्यमापन एकांगी होईल.महाराष्ट्रात फिरताना मला शिक्षकांचे ३ प्रकार दिसतात. राजकीय गैरफायदा,शिक्षक संघटनेचा लाभ घेणारा, अधिकाऱ्यांचा गैरफायदा घेणाराएक वर्ग आहे पण तो संख्येने खूप कमी आहे पण त्याचीच चर्चा जास्त होते. दुसरा गट सर्वात मोठा आहे तो जसे वळण द्याल तसा झुकणारा आहे.अर्थाततो काम करतोय पण त्यात प्रेरणा किंवा फार प्रतिभा समर्पण नाही पण तो लवचिक आहेआणि बदलू शकेल असा आहे. या

वर्गाला दिशा देण्याची गरज आहे आणि तिसरा घटक हा २० ते २५ टक्के असलेला आहे.तो स्वयंप्रेरणेने काम करणारा आहे.या शिक्षकांना कोणी सूचना करण्याची गरज नाही ते आपाआपले काम करीत राहतात.त्यात प्रतिभा असते,समर्पण असते. असे खेड्यापाड्यात मी खूप शिक्षक पाहिले. पहिलीचा मुलगा एक कोटीपर्यंत शब्द लिहिताना दिसला. ऑस्ट्रेलिया सारखा शब्द लिहिताना पाहिला. खूप शैक्षणिक साहित्य बनविलेले शिक्षक भेटले. तंत्रज्ञान आत्मसात करून जागतिक दर्जाचे अनेक शिक्षक आज महाराष्ट्रात आहेत. सामाजिक चळवळीत भाग घेणारे शिक्षक आहेत. महाराष्ट्रातील अनेक चांगले लेखक,कवी हे शिक्षक व प्राध्यापक आहेत.मी शोध याचा घेतो आहे की ही माणसे अशी वेगळी का असतील ? नेमकी कोणती गोष्ट यांना इतरांपेक्षा वेगळी बनवत असेल ? प्रतिकूल परिस्थिती यांना निराश करत नसेल का ? कशातून हे उमेद टिकवतात? हा मला प्रश्न पडला.अगदी छोट्या छोट्या प्रेरणेने माणसे काम करत राहतात. या गुरुजी संस्कृतीच्या शिक्षकांना वंदनच केले पाहिजे फक्त याचे सार्वत्रिकरण कसे करायचे हा खरा मुद्दा आहे.

शेवटचा मुद्दा जागतिकीकरणात गुरुजी निर्माण होतील की सगळीकडे सर--सर असतील ? याचे उत्तर जागतिकी करण आज शिक्षकाची भूमिका मर्यादित करायला निघाले आहे. नव्हे शिक्षकाला रोबो हा पर्याय निर्माण करणार आहे. गुरुकुलातला पूर्णवेळ शिक्षक ते आजचा ऑनलाइन शिक्षक हा प्रवास जागतिकीकरण घडविणार आहे. शिक्षकाशिवायची शिक्षणपद्धती जिथे येऊ घातली आहे तिथे गुरुजी युग सोडाच पण सर तरी शिल्लक राहतील का ? हा मला प्रश्न पडतोय. संपादकाशिवाय जर पेपर निघू शकतो, अनिमेटेड फिल्म मध्ये नायकाशिवाय चित्रपट असू शकतो तर मग शिक्षकाशिवाय शाळा का चालू शकणार नाही ? असा इथून पुढचा युक्तिवाद असणार आहे. आणि खरे तर वेगाने आत्मकेंद्रित होत चाललेल्या आजच्या समाजाला प्रेम,माया,करुणा शिकवायला पुन्हा एकदा गुरुजीसंस्कृतीच आवश्यक असणार आहे. ही गुरुजी संस्कृतीच काय पण ऑनलाइन शिक्षक नव्हे तर instructor असलेल्या येणाऱ्या काळात हा समाज कसा असेल याची कल्पनाच येत नाही पण जोपर्यंत आपण प्रेम आणि करुणा ही मूल्ये वेुपश्रेरव करू शक्त नाही तोपर्यंत तीच मूल्ये शिक्षणातून संक्रमित करावी लागणार आहेत. त्यासाठी पुन्हा गुरुजी युगाचीच आस धरावी लागेल ..

हे सारे कसे करावे ? याचे उत्तर शोधायला पुन्हा एकदा साने गुरुजींकडे जावे लागेल असे वाटायला लागलं...ज्यांचे नंबर डॉक्टर इंजिनिअरिंग ला लागू शकले असते असे अनेकजण शिक्षक झालेत आणि अनेक नेट सेट सारखी अवघड परीक्षा पास झालेले प्राध्यापक झालेत पण त्यांच्यामुळे शिक्षणव्यवस्था बदलली नाही. ते समर्पित फारसे आढळेना त्यातून शिक्षक हा जितका स्वप्नाळू भाबडा आणि भावुकच तितका तो अधिक चांगला शिक्षक होण्याची शक्यता जास्त हे लक्षात येत गेले. इथे बुद्धिमत्तेइतकेच मुलांविषयी कणव वाटणे सर्वोच्च महत्वाचे आहे हे समजल्यावर साने गुरुजी हीच लस पुन्हा एकदा शिक्षक समुदायात द्यावी लागेल याची खात्री पटली.. तेव्हा अशा गुरुजी संस्कृती ज्यांच्या रक्तात आहे अशा शिक्षकांना शिक्षक समुदायला भेटविले पाहिजे. शिक्षक प्रशिक्षण हा शब्द आता किळसवाणा झाला आहे. त्यासाठी निसर्गरम्य ठिकाणी निवासी केंद्र उभारली पाहिजेत. शिक्षकांना तिथे निवासी काही दिवस राहण्याची सोय करावी व तिथे महात्मा फुले महात्मा गांधीपासून जे पी नाईक कृष्णमूर्ति साने गुरुजी ओशो या सर्वांच्या विचाराचा परिचय करून द्यावा. जगातील,भारतातील आणि महाराष्ट्रातील उत्कृष्ट शिक्षकांच्या मुलाखतीच्या फिल्म असाव्यात...जीवनशैली बदलण्यापासून विपश्यनेपर्यंत सगळे शिकवावे आणि त्यातून शिक्षक बदलण्याची सुरुवात होईल. शिक्षकांनी वाचन करावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावेत.

पण कधीकधी वाटते शिक्षक बदलत नाही याला कारण त्यांच्यावरील अधिकारी मुख्याध्यापक हे प्रेरणादायी नाहीत. तेव्हा ७ लाख शिक्षकांच्या मागे लागण्यापेक्षा ३५ शिक्षणाधिकारी ,३५४ गट शिक्षणाधीकारी ,४५०० केन्द्रप्रमुख,१५०० विस्ताराधिकारी ,सर्व विद्यापीठ कुलगुरू आणि प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य हे बदलण्यावर भर दिला पाहिजे . हे बदलले की शिक्षक सहज बदलतील. एक शिक्षक मला तळतळून म्हणाला होता सर अहो आम्ही शिक्षक म्हणजे यंत्र आहोत तुम्ही कोंबडी मागा कोंबडी देतो. पैसे मागा पैसे देतो आणि काम मागा काम देतो तेव्हा खरी गुरुजी होण्याची संस्कृती वरुण खाली झिरपायला हवी.. अधिकारी मनाने गुरुजी होणे गरजेचे आहे त्यातून सरांचे गुरुजी वेगाने होऊ लागतील

ताजा कलम असे लेख लिहिल्यावर सगळेच असे आहेत

का ? चांगले शिक्षक दिसत नाहीत का ? हे खूप ऐकावे लागते. अशा शिक्षकांवर लिहिलेच आहे .त्यांना वंदन कारण त्यांच्या प्रेरणेवरच सारी आशा जीवंत आहे पण रस्त्यात खड्डे पडल्यावर आपण खड्ड्यांचा फोटो छापतो तेव्हा चांगला रस्ता दिसत नाही का हे विचारण्यात अर्थ नसतो..प्रश्न व्यवस्था बदलण्याचा आहे. त्यामुळे त्याची उत्तरे व्यक्तीगत आहेत पण त्यापेक्षा जास्त व्यवस्थात्मक आहेत. रजनिश म्हणाले होते की शिक्षण क्षेत्रातून पुरुष हटवा आणि फक्त महिलाच फक्त राहू द्या कारण हे प्रेमाचे हळुवारतेचे क्षेत्र आहे ..ओशोंना हे गुरुजीकडे बघून तर सुचले नसेल ना ...?

*मागे वळून पाहतांना...*

## किल्लारी भूकंपाचा आघात...३० सप्टेंबर १९९३ ची काळरात्र



*हजारोंचा बळी घेणारा किल्लारी येथील भीषण भूकंप*

महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील किल्लारी इथे ३० सप्टेंबर, १९९३ रोजी ६.५ रिश्टर स्केलचा भीषण भूकंप झाला आणि त्यात दहा हजारांवर माणसांचा बळी गेला. मनुष्यहानीच्या दृष्टीने भारतातील मोठ्या भूकंपांपैकी एक असा हा भूकंप मानला जातो.

या भूकंपात सुमारे १० हजार माणसांचा मृत्यू ओढवला, असं अधिकृत आकडेवारी सांगते. प्रत्यक्षात जवळपास ३० हजार माणसं या घटनेत मारली गेली, असं मानलं जातं. या भूकंपाचा धक्का रिश्टर स्केलवर फार मोठा नव्हता, पण त्यातून मोठी मनुष्यहानी आणि वित्तहानी झाली.

किल्लारी हे लातूरजवळचं एक छोटंसं गाव. गावाची लोकसंख्या १५ हजारांच्या आसपास. ३० सप्टेंबरच्या पहाटे ३ वाजून ५६ मिनिटांनी भूकंपाचा पहिला धक्का बसला, तेव्हा लोक झोपेत होते. या भागातली घरं प्रामुख्याने माळवदाची. मोठमोठाले दगड एकमेकांवर रचून आणि मध्ये मातील घालून या घरांचं बांधकामं केलेलं असतं. घराचं छप्परही दगड आणि मातीनेच बनवलेलं असतं. भूकंपाचा जोरदार धक्का बसल्यानंतर या भिंती आणि छपरं कोसळली. माणसं त्याखाली गाडली गेली त्यामुळे या गावातील तब्बल हजारभर माणसं मृत्यूमुखी पडली. बरेचसे लोक दगड, विटा आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. बरेचसे जायबंदी झाले. किल्लारीतील जवळपास ९० टक्के घरं या भूकंपात भुईसपाट झाली. किल्लारी हे गाव मुख्य शहरापासून/शहरी भागापासून अंतरावर असल्याने भूकंप झाल्यानंतर जखमी लोकांना मदत मिळण्यासही बराच विलंब झाला. त्यामुळेही मृतांच्या आकड्यात भर पडली.

किल्लारी या छोट्या गावासह लातूर-उस्तानाबाद या दोन जिल्ह्यांनाही या भूकंपाची झळ बसली. ३० सप्टेंबरच्या मध्यरात्री ३वाजून ५६ मिनिटांच्या पहिल्या धक्क्यानंतर पहाटे ४:४१, सकाळी ६:२४ व सकाळी ७:४८ असे आणखी तीन धक्के बसले. यांतील पहिले दोन धक्के मोठे होते. गणपती विसर्जन करून झोपी गेलेल्या लोकांवर या दोन धक्क्यांनीच झडप घातली. क्षणार्धात गावं होत्याची नव्हती झाली. घरांच्या ढिगाऱ्याखाली हजारो माणसांचे जीव दडपले गेले. बहुतेक लोक झोपेतच मारले गेल्यामुळे आपल्यावर काळ झडप घालत आहे, हे त्यांना कळूच शकलं नाही.



# हरवलेलं-गवसलेलं...

**राजेंद्र उगले**
नाशिक
९९२२९९४२४३

गुरुजी नमस्कार !

आजच्या शिक्षक दिनी तुम्हाला नम्रतापूर्वक नमस्कार ! तसा प्रत्येकाने रोजच नमस्कार करावा इतकं तुमचं कार्य महान आहेच पण काय करणार सोशल मिडियाचा जमाना ना आमचा ! आम्हाला त्या त्या दिवसापुरतं का असेना पण अपडेट राहवं लागतं. का म्हणजे ? अहो ते आम्ही आमचं आद्य कर्तव्यच मानतो..! म्हणजे बघा, मी आज सकाळी उठल्या उठल्याच पहिलं माझं व्हॉटसअपचं स्टेट्स बदललं ' गुरु ने दिला ज्ञानरुपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा ! ' त्यानंतर माझ्या फोनमध्ये असलेल्या सर्व गुरुजींना खूप फुलं पाठवून दिलीत. अगदी गल्लीतच राहणाऱ्या माझ्या पहिलीच्या वर्गाला असणाऱ्या उगले गुरुजींना सुद्धा ! खरं तर ते खूप थकलेत आता. हे मोठ्ठा चष्मा लागलाय डोळ्यांवर... त्यांचा एकुलता मुलगा अमेरीकेला असतो. आणि बाई तर केव्हाच गेल्यात. एरवी ते मारत असतात मला कामानिमित्त हाका पण वेळच नसतो ना ! म्हणजे त्यांनी काही काम सांगितलं तर ? या भितीनंच मी त्यांच्या घराजवळून सुद्धा फारसा नाहीच फिरकत. , पण त्यांना सुद्धा मी आठवणीने आज शुभेच्छा पाठवल्यात. एक दोन गुरुजींनी तर उत्तरादाखल हात जोडून आभार देखील मानलेत.

माझ्या बाबांनी त्यांच्या काही गुरुजींना फोन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. मी म्हटलं त्यांना , काय बाबा हे... जमाने के साथ चलना शिको..! यावर त्यांनी शिको या शब्दावरुन वाद घातला. म्हणाले काय रे तुमची ही पिढी ? या पिढीला बिघडंवलंय या टी. व्ही. वाल्यांच्या हिंदीने. ते म्हणतात गुरुजींच्या घरी जावं, त्यांना नम्रतापूर्वक नमस्कार करावा. हे काय नुसतं फुलं पाठवतोस? त्या फुलांना ना गंध , ना त्यात कृतज्ञ भाव ! हे असं कोरडं अभिनंदन करण्यापेक्षा , शुभेच्छा देण्यापेक्षा काहीच न केलेलं बरं . आता मला सांगा , तुम्हाला शुभेच्छा न देणं म्हणजे तुमचा गैरसमज होईल की नाही आमच्याबद्दल ? बघा ही आजची पिढी. आम्हाला साध्या शुभेच्छा पण नाही देत. म्हणून बाबा काहीही म्हटले तर म्हणू देत मी पाठवल्याच सर्वांना शुभेच्छा ! गुरुजी , तुम्ही म्हणायचे त्यावेळी, खूप वाचा ... पुस्तकं मस्तकं घडवतात वगैरे. पण आज वाटतं बरं झालं वेळ वाया नाही घालवला. अहो आजकाल सोशल मिडियामुळे काहीच करायची गरज नाही भासत. सगळं कसं तयार असतं... ते ही एकदम भारी..! मागे मी असंच लिहिलं होतं, अरे आपण रोज प्रतिज्ञा म्हणतो , भारत माझा देश आहे . सारे भारतीय माझे बांधव आहेत . पण प्रत्यक्षात काय ? आम्ही बंधुभाव पाळतो ? अरे काय वाटेल त्या पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांना ? त्यांनी का उगाच लिहिली का ही प्रतिज्ञा ? यावर माझ्या एका मित्राने खूप कौतुक केलं माझं. म्हणाला , वाचन फार वाढलं भौ तुझं... आता मला तरी कुठं काय माहीत होतं ही प्रतिज्ञा कोणी लिहिली ते ? पण माझा एक वसूल आहे. आलेला मेसेज पुढे पाठवायचा. किती शिकायला मिळतं ! मी तर दोन एक गृपचा ॲडमिन सुद्धा आहे.

थोडं विषयांतर झालं का ? असो. चालतंच एवढं तेवढं. बाकी तुम्ही काय म्हणताय ते सांगा. मागे एकदा असेच भेटलो होतो आपण सायबर कॅफेमध्ये . खरं सांगू का मी जाम घाबरलो होतो तुम्हाला पाहून. पण तुम्ही स्वतःहून जवळ आलात आणि

मी तुमची माहिती ऑनलाईन भरुन दिली. काय होतं ते? हं आठवलं . बहुतेक पोषण आहार, सरल, शिष्यवृत्ती असं बरंच काही काही होतं त्यात. तुम्हाला किती आनंद झाला होता. आता येतं ना तुम्हाला ते सगळं ? नाही म्हणजे आता शाळा डिजीटल झाल्याचं वाचलं मी पेपरात.खरंच किती किती कामं असतात ना तुम्हाला ? पण तुम्ही अगदी वेळेवर करता सगळं. म्हणजे टाईम मॅनेजमेंट खरं तर तुमच्याकडूनच शिकलं पाहिजे.

गुरुजी, तुम्ही सदैव परोपकारीच असतात. आम्ही घडलो ते तुमच्यामुळेच! आपल्या वर्गातली मुलं मोठी व्हावीत. ज्ञानानं , कर्तुत्वानं यासाठीच तुमचा सतत अट्टाहास असतो. त्यातली काही यशस्वी होतात तर काहींना नाही गवसत इच्छित साध्य. पण तुम्ही सतत सुरु ठेवतात तुमचे प्रयत्न ! न थकता. अगदी अविरत ... आज तुमच्यामुळेच आम्ही डॉक्टर , इंजिनिअर , वकील, शिक्षक, शास्त्रज्ञ , व्यावसायिक अशा विविध क्षेत्रात ठसा उमटवू शकतो. एवढेच काय देशाचे संरक्षण क्षेत्र असो की राजकीय क्षेत्र असो तुमच्याशिवाय तिथं पोहचनं केवळ आणि केवळ अशक्य आहे. म्हणूनच तुमच्या महानतेला आणि कार्यकर्तुत्वाला आजच्या शिक्षक दिनी मानाचा मुजरा करतो. तुमच्या तळमळीला सलाम करतो.

शेवटी एकच सांगतो.

गुरु असतो मंदिर, गुरु असतो कळस<br>
शिष्य मोहरुन जावा, गुरु असा मोरपीस ..!

*शिक्षक दिन निमित्ताने ....*

## शिरपूर वरवाडे नगर परिषद शिक्षण मंडळ तर्फे उपक्रमशील शिक्षकांना पुरस्कार प्रदान

शिरपूर वरवाडे नगर परिषद शिक्षण मंडळातर्फे २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षासाठी उपक्रमशील शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ महाराष्ट्र राज्याचे माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

उपनगराध्यक्ष भुपेशभाई पटेल म्हणाले की, सर्व गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांसह सर्वांचे कौतुक करणे गरजेचे आहे. सर्वांनी भारतीय संस्कृतीचे पालन करावे. आर.सी.पटेल संस्थेत २.५० लाख चौ. फूट इमारतीत अत्याधुनिक वाचनालयाचे काम अंतिम टप्प्यात सुरु आहे. तालुक्यातील कोणीही त्या लायब्ररीचा लाभ घेऊ शकतो. शिक्षक हे परमेश्वराचे स्वरूप आहेत म्हणून प्रत्येकाने ईश्वरीय कार्य करुन सुसंस्कृत पिढी घडवावी. मुलांना घडवा, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी सर्वस्वी प्रयत्न करावे. माझ्यासह अनेक विद्यार्थी न.पा. च्या पी.बी.एम. शाळेचे असून शाळेला सुंदर रुप प्राप्त करुनदिले आहे. येथे अत्याधुनिक संगणक लॅब, प्रयोगशाळा, ५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत हे सर्वांसाठी कौतुकास्पद आहे.

प्रास्ताविकात राजेंद्र अग्रवाल म्हणाले की, आमदार अमरिशभाई पटेल, नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, उपनगराध्यक्ष भुपेशभाई पटेल यांच्या पाठबळामुळे शिक्षण मंडळाची घोडदौड यशस्वीपणे सुरु आहे. न. पा. शाळा भरभराटीस येत आहेत. महाराष्ट्रातील उत्कृष्ट शाळांपैकी शिरपूर न.पा. च्या शाळा आहेत ही सर्वांसाठी भूषणावह बाब आहे.

सुभाष कुलकर्णी म्हणाले की, चांगले शैक्षणिक कार्य करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक कलेच पाहिजे. उत्कृष्ट कामाचा ठसा सर्वांनी उमटवावा.

तसेच पुरस्कार प्रदान सोहळयात पुढील उपक्रमशील शिक्षकांचा सहपरिवार गौरव करण्यात आला. पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूलचे शिक्षक जयेश गंगाधर महाजन व रमेश पांडया गावित, न.प.शाळा क्र. १ चे शिक्षक गणेश रामदास माळवे, न.प.शाळा क्र. ७ च्या शिक्षिका श्रीमती सोनाली भगवान गाडीलोहार, न.प.शाळा क्र. ४ चे शिक्षक मो.शाकिर अ. जब्बार कुरेशी, नवलबेन गणेश पटेल प्री-प्रायमरी स्कूलच्या श्रीमती सिमा बाबुराव जाधव, सगुनाबेन चंपकलाल वैद्य प्री-प्रायमरी स्कूलच्या श्रीमती मालती पदमाकर धाकड, जुहू जागृती उर्दू प्री-प्रायमरी स्कूलच्या श्रीमती नाजेरा मसुद मुजावर, न.प. शाळा क्र. १ शिक्षिका श्रीमती भावना किरण चौधरी यांचा स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व गुलाबपुष्प देवून सत्कार झाला.



# नात्यांची वीण विणताना



**युवराज माने**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी,
तालुका सेलू जिल्हा परभणी.
७५१७४७८५७०

माझ्या आयुष्यातील हा पहिला प्रसंग होता की, जिथे माझ्यासाठी अनेक डोळ्यातून अश्रूधारा वाहत होत्या . प्रत्येक चिमुकलं मूल गहिवरून रडत होतं .माझ्या गाडीची चावी लपवून ठेवणारे, मला वर्गात बंद करणारे, बॅगला कवटाळून धरणारे,शाळेच्या गेटपर्यंत सर नको जा ,प्लीज सर नका जाऊ ना. असा आवाज देणारे ,माझ्या हाताला धरून ओढणारे व माझा रस्ता रोखून धरणारे माझे विद्यार्थी आणि ढसढसा रडणारे गावकरी आजही डोळ्यासमोर उभे राहतात अन, आपसुक डोळ्यांच्या कडा ओल्या होतात...

मुलांच्या वेगवेगळ्या कल्पनाविश्वात मी उद्याचे वास्तव शोधण्यात गुंग होतो. वेगवेगळ्या कल्पना प्रत्यक्षात उतरवताना सेवेची सात वर्ष कशी गेली हे समजलंच नाही. या चिमुकल्यांसोबत केवळ मला पगारचं नाहीतर त्यापेक्षा खूप काही मिळत होतं . मी मुलांचा शिक्षक नव्हे तर मित्र ,भाऊ सोबती झालो होतो.बरेचदा वेगवेगळे उपक्रम राबवताना आजूबाजूंच्या गुरु जणांकडून टीकाही सहन करावी लागायची. केवळ उपक्रमातच वेळ घालवता, इतर गुणवत्तेचे काय?असे प्रश्न समोर यायचे. खरतर या उपक्रमांच्या माध्यमातून केवळ पुस्तकीगुणवत्तेपेक्षा माझे चिमुकले पुढचा विचार करत होते. शाळेत राबविले जाणारे उपक्रम केवळ उपक्रम न राहता ते आम्हा सर्व चिमुकल्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग झाले होते.हे पाहायला कोणालाच वेळ नव्हता. माझ्या शाळेतील चिमुकले त्यांच्या जीवनातील संबंधित सर्व गोष्टींचा विचार करू शकत होते. प्रत्येक विषयावर बोलू शकत होते .लिहू शकत होते. आणि हा अभिव्यक्तीचा आनंद आम्हा शिक्षकांना तर होतच होता याशिवाय कुटुंबातील त्यांच्या आई-वडिलांनाही आपलं स्वतःच लेकरू वेगवेगळ्या विषयावर अभिव्यक्त होताना एक वेगळाच आनंद देऊन जात होतं. तरीही मी गुणवत्तेच्या बाबतीत विचार करू लागलो. मला माझं बालपण आठवलं. मी वर्ग आठवीत असताना माझ्या शाळेत मा.बलवंत पवार नावाचे नवीन गुरुजी आले. सुरुवातीला अतिशय कडक शिस्तीचे व रागीट स्वभावाचे गुरुजी अशी त्यांची ओळख झाली. पण काही दिवसांनी त्यांनी शाळेचा चेहरामोहराच बदलण्याचा ठरवलं. आणि आमच्या दिवसाची सुरुवात सकाळी चार वाजता सुरू होऊ लागली. पवार गुरुजी सकाळी चार वाजता उठायचे आणि पूर्ण गावातील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन उठवायचे. तीनशे ते चारशे विद्यार्थी घेऊन पवार गुरुजी दररोज पाच किलोमीटर मुलांसोबत स्वतः रनिंग करायची. चार ते सहा या वेळेमध्ये मुलांकडून शारीरिक मेहनत ,व्यायाम करून घ्यायचे. नंतर सहा ते आठ अभ्यासिका ज्यामध्ये आपापल्या वर्गाचे विद्यार्थी शाळेमध्ये अभ्यास करायचे. आठ ला सुट्टी आणि दहाला पुन्हा शाळेत मुले यायची. दहा ते चार या वेळेमध्ये शाळा आणि पुन्हा संध्याकाळी सहा ते नऊ अभ्यासिका व्हायची. नऊ वाजता वंदे मातरम होऊन मुलं आपापल्या घरी जायची .सर्व शाळा वर्गखोल्या बंद करून घरी जायला पवार सरांना दहा वाजायचे .पुन्हा सकाळी नेहमीप्रमाणेच पवार सरांचा दिवस चार वाजता सुरू व्हायचा. या पवार नावाच्या गुरुजींचा माझ्या जीवनाला स्पर्श झाला आणि माझं सोनं झालं. जर माझ्या जीवनात एवढी मेहनत घेणाऱ्या गुरुजी मला भेटला तर आपणही आपल्या मुलांसाठी हे का करू नये? असा प्रश्न सतत मला भेडसावायचा . परंतु आपण परजिल्ह्याची माणसं .येथील गावकऱ्यांना माझ्या

इतर सहकार्यांना हे आवडेल की नाही याचा जास्त विचार करू लागलो. याशिवाय पहिली ते सातवी या वयोगटातील लहान मुलं आहेत.आपण या पद्धतीचं पाऊल उचललं तर काही दुर्घटना होऊ नये याची पण भीती वाटायची. मुख्याध्यापक या गोष्टीला परवानगी देतील की नाही ही असे वेगवेगळे प्रश्न डोक्यात घोंगावत होते. करण्याची इच्छा मात्र प्रबळ होती.

मुलांत कार्य करायचं म्हणजे मुलांच्या आई बाबांमध्ये विश्वास निर्माण करायला हवा हे मला नेहमी जाणवत असायचं म्हणून मुलांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी मी बारकाईने समजून घेतली आणि प्रत्येक कुटुंबामध्ये एक स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करू लागलो . प्रत्येकांच्या घरचा सदस्य मी झालो. गावकऱ्यांच्या सुखांशी जोडणारा शिक्षक भेटल्यास त्याच्यावर जीव ओवाळून टाकतात याचा अनुभव पावलापावलावर येऊ लागला होता . उपक्रमांच्या माध्यमातून पालकांना विश्वासात घेण्यात आलं होतं आणि मला शाळेमध्ये अभ्यासिका सुरू करायची आहे हा विचार प्रत्येक पालकांच्या डोक्यात विनू लागलो होतो .खरं तर आदिवासी भागांमध्ये काम करताना रात्रीची अभ्यासिका व पहाटेची अभ्यासिका गावकरी मान्य करतील की नाही असंच मला वाटत होतं .मात्र शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी व गावकरी यांना ही कल्पना खूप आवडली. माझे चिमुकले तर आनंदाने उड्याच मारू लागले. मी माझ्या मनातील विचार शाळेच्या मुख्याध्यापक व सहकाऱ्यांशी बोलून दाखवला परंतु माझे सहकारी नेमून दिलेल्या चाकोरीबद्ध शिक्षणाच्या पलीकडे जायचा विचारच करत नव्हते. माझ्या चिमुकल्यांच्या व गावकऱ्यांच्यासमोर त्यांना नमतं घ्यावं लागलं आणि मी माझ्या स्वतःच्या जिम्मेदारीवर अभ्यासिका सुरुवात केली, प्रथम सर्व चिमुकल्यासोबत वर्गातील अडीअडचणीच्या सर्व जागा स्वच्छ करून घेतल्या .लाईटची व्यवस्था करण्यात आली. जिल्हा परिषदेची आमची गावची शाळा-आमची आई होती. आमच्या या आईच्या सनिध्यामध्ये रात्रीची अभ्यासिका सुरू झाली. शाळेलाही खूप आनंद झाला.सर्वत्र लाईटचा प्रकाश पडला आणि लेकरांच्या डोळ्यातील तेज आणखीच उजळून गेलं. मुलांसाठी दररोज सकाळी पाच वाजता मी शाळेत पोहोचू लागलो. पाच ते सहा या वेळेत व्यायाम सहा ते आठ अभ्यासिका अशा स्वरूपाचं काम सुरु झालं .शाळा सुटल्यानंतरही रात्री सहा ते आठ अभ्यासिका सुरुवात केली. जिथे विद्यार्थी शाळेत यायला तयार नव्हते तेथे रात्र अभ्यासिका व सकाळचा अभ्यासिका मध्ये विद्यार्थी अगदी मनाने स्वतःहून रमू लागले. गावातील जाणकार व्यक्ती अभ्यासिकेस भेटी देऊ लागले आणि आपल्या मनातील भावना व्यक्त करू लागले. गावात एक वेगळीच शैक्षणिक चळवळ उभा राहिली याचं मला समाधान वाटू लागलं. या माध्यमातून गावांमध्ये एक वेगळे वातावरण तयार झालं होतं .विद्यार्थी अभ्यासात रमू लागला होता. गावामध्ये अभ्यासाचे वातावरण तयार झालं होतं गावकरी शाळेकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले आणि माझा उद्देश सफल झाला असं वाटू लागलं. ज्या गावची शाळा प्रयोगशील आहे त्याच गावांमध्ये उद्याची प्रयोगशील नागरिक सुद्धा घडतात याच मी स्वतः एक उदाहरण आहे.

शाळेतील सहल, स्नेहसंमेलन , रात्र अभ्यासिका, पहाटेची अभ्यासिका,क्रीडा सत्र अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळा आता फुलू लागली होती. पण अशातच एक संघर्षमय प्रकाराला सामोरं जावं लागलं. आंतरजिल्हा बदलीने त्या गावच्या रहिवाशी असणाऱ्या एक शिक्षिका माझ्या शाळेत रुजू झाल्या आणि त्यामुळे मी अतिरिक्त शिक्षक म्हणून गणला गेलो( जिथे शाळेत एकही पद रिक्त नव्हतं तिथं प्रशासन सुद्धा गांधारीप्रमाणे वागत होतं. गरज नसताना शाळेवर प्रशासन मेहरबान झालं होतं.) परिणाम म्हणजे माझी त्या शाळेतून बदली होणार हे निश्चित झालं. जेव्हा सर्व चिमुकल्यांना समजलं तेव्हा सर्वजण चिंताग्रस्त झाले. मुलांनी ही बातमी आपल्या पालकांना कळवली. गावकऱ्यांना हे समजलं तेव्हा गावकऱ्यांनी गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत अनेक ठिकाणी अर्ज दाखल केले. आम्हाला या गुरुजी शिवाय दुसरा गुरुजी नको आहे परंतु भोळ्याभाबड्या गावकऱ्यांचे प्रशासनासमोर काही चालत नव्हतं. पण गावकरी हार मानत नव्हते. गुरुजी, आम्ही तुम्हाला जाऊच देणार नाहीत असा त्यांनी हट्ट धरला होता. मी गावकऱ्यांना विनंती करू लागलो, नवीन शिक्षिका या तुमच्याच गावच्या आहेत त्या माझ्यापेक्षा जास्त वेळ देतील.२४ तास गावात शिक्षक उपलब्ध होतील. शिवाय त्या महिला आहेत. इतर दुसरीकडे दूर कुठे जातील. जाऊ द्या मी स्वतः जातो दुसरीकडे. पण गावकरी आपल्या या निर्णयाला बदलायला तयार नव्हते.मी माझ्या चिमुकल्यांनाही समजावून सांगत होतो. बाळांनो, नोकरी आहे तर बदली होणारच. आणि मी काही तुमच्या जीवनाच्या शेवटपर्यंत सोबत

थोडी राहणार आहे.मला जावंच लागेल.माझी बदली होणार या विचाराने माझ्या वर्गातील विद्यार्थी तर खूपच बेचैन झाले. शेवटी माझ्या बदलीचा आदेश आला आणि मुख्याध्यापकांनी मला कार्यमुक्तही केलं. गावकऱ्यांना हे जेव्हा समजलं तेव्हा गावकऱ्यांनी त्याच रात्री सभा घेऊन ठरवलं की ,उद्यापासून शाळेत एकही मुल पाठवायचं नाही.. जोपर्यंत माने गुरुजींना पुन्हा शाळेत जॉईन करून घेत नाही तोपर्यंत आम्ही एकही मुलगा शाळेत पाठवणार नाही असा ठराव त्यांनी जिल्हा परिषद ,पंचायत समितीकडे पाठवला. इकडे मला गावकऱ्यांनी सक्तीच्या रजेवर पाठवलं. ठरल्याप्रमाणे गावकऱ्यांनी शाळेत एकही मूल जाऊ दिलं नाही. शाळेत केवळ गुरुजी घेऊन बसायचे. विद्यार्थ्यांविना आमची शाळा भरू लागली. असे सतत चार दिवस घडलं. पाचव्या दिवशी पत्रकारांनी सर्व वर्तमानपत्राच्या घडलेल्या घटनेची दखल घेतली. याची दखल तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी घेतली व प्रत्यक्ष शाळेत येऊन सहाव्या दिवशी मला पुन्हा शाळेमध्ये रुजू करून घेण्यात आलं... नव्याने रुजू झालेल्या सदरील शिक्षिका ह्या त्याच गावच्या असल्यामुळे हा त्या गावचा एक संवेदनशील व चिंतेचा मुद्दा बनला होता. अशा परिस्थितीमध्ये दुसऱ्या जिल्ह्यातून आपल्या गावात आपल्या मुलांसाठी झटणाऱ्या व्यक्तीस त्यांनी जाणला होता. त्याची प्रचीती म्हणून त्यांनी केलेला संघर्ष आणि मला पुन्हा त्या शाळेत रुजू करून घेतले ही त्यांची त्याची पावती होती. मी त्या गावचा केवळ गुरुजी न राहता त्या गावचा प्रत्येक घरातील एक सदस्य झालो होतो आणि त्यांनी मला स्वीकारलं होतं हे सिद्ध झालं.त्यानंतर पुन्हा आमचा हा शिक्षणाचा आनंददायी प्रवास सुरू झाला परंतु ज्या ठिकाणी संघर्ष आला त्याठिकाणी पुन्हा अशा कार्याची रुजवात होणं कठीणच असतं .सहा महिन्यानंतर मी स्वतःहून दुसऱ्या शाळेत जाण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या शाळेचा शोध घेत असताना मला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पलखेडा ही एकमेव शाळा जिथे पद रिक्त होतं. या शाळेत यापूर्वी एकही शिक्षक जायला तयार नव्हते परंतु मी ती शाळा स्वतःहून घेतली.दवडीपार शाळेचा निरोप समारंभ मी माझ्या आयुष्यात कधीच विसरू शकत नाही .ज्यादिवशी माझा निरोप समारंभ झाला त्या दिवशी शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आणि गावकरी माझ्यासाठी अश्रू ढाळत होते .माझ्या आयुष्यातील हा पहिला प्रसंग होता की जिथे माझ्यासाठी अनेक डोळ्यातून अश्रूधारा वाहत होत्या . आपला गुरुजी आपली शाळा सोडून जाऊ नये म्हणून, माझे विद्यार्थी माझ्या गाडीची चावी लपवून ठेवू लागले ,मला वर्गामध्ये बंद करू लागले..माझी बॅग कवटाळून धरू लागले.शाळेच्या गेटपर्यंत सर नको जा .सर प्लीज नका जाऊ .असा आवाज देणारे माझ्या हाताला धरून ओढणारी विद्यार्थी आजही मला तसेच डोळ्यासमोर उभे राहतात. गावातील गावकऱ्यांना शिक्षणातले काही कळत नाही गावकरी माझ्यासाठी ढसढसा रडताना मी पाहिले.हे चित्र मी माझ्या आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही. आणि या विद्यार्थ्यांची प्रेरणा घेऊन मी सातत्याने यापुढेही काम करण्याचा निर्णय घेतला.

एखादा शिक्षक मुलांच्या भावविश्वात किती खोलवर रुजू शकतो. याच स्वतः प्रत्यक्ष उदाहरण होताना मनस्वी समाधान आहे. प्रेम हीच शिक्षकाची आणि शिक्षणाची भाषा असावी हाच बहुमूल्य संदेश माझ्या चिमुकल्यांच्या व गावकऱ्यांच्या अश्रूतून प्राप्त होतो.


## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ३५० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-. १००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--512700301000129 Ifsc-VIJB0005127

जाने-१९ ते डिसें१९(एक वर्ष) जाने१९ ते डिसें२०-२वर्ष जाने १९ते डिसें २१-३वर्ष

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मु.पो.ता.-शिरपुर जि.-धुळे ४२५४०५ (मोबा.८२०८३०१००१)



**प्रियंका अनिल पाटील**
जि.प.शाळा मुगधन
ता.नवापूर जि.नंदुरबार
९४२११०८२७२

# मुले नि भिंगोटा...



जीवन हा प्रवास आहे , ती एक सुंदरशी हिरवळीने नटलेली पाऊलवाट आणि आपण सर्वजण त्या पाऊलवाटेवरचे प्रवासी ... हा प्रवास प्रत्येकासाठी वेगळा असु शकतो. कोणी हसत, कोणी रडत तर कोणी लढत या प्रवासासाठी सज्ज झालेले असतात. हसणाऱ्यांसाठी सुखद, रडणाऱ्यांसाठी अडथळ्यांचा तर लढणाऱ्यांसाठी अत्यंत रोमांचक असतो हा प्रवास ... प्रत्येकाला आलेल्या बऱ्या वाईट अनुभवांची शिदोरी घेऊन जो– तो जीवन नौका हाकत असतो .... अनुभव हा सर्वश्रेष्ठ गुरु असतो. त्यातुनच मानवी जीवन घडते , ज्याला जगण्याचा सूर गवसला तो समृद्ध झाला म्हणून समजा !

मी एक प्राथमिक शिक्षिका आहे . माझ्यासाठी प्रत्येक दिवस नवा अनुभव घेऊन येतो आणि त्या अनुभवातून मी रोज शिकत राहते .... मी मुलांना शिकवते असे मी म्हणणार नाही कारण खरे तर मी त्यांना शिकवण्यापेक्षा माझी मुलेच मला शिकण्याची रोज संधी मिळवुन देतात... लहान मुलं ही अनुभवांची चालती बोलती विद्यापीठेच असतात जणु ! असाच माझा एक छोटासा अनुभव आज सर्वांना सांगावासा वाटतो . सोमवारचा दिवस. मी नेहमीप्रमाणे शाळेत पोचले ... गेल्यागेल्या मुलांचा गराडा भोवतीच. रवीवारच्या सुटीनंतर मनसोक्त खेळून , रानोमाळी भटकून , शेतातील ताजी हिरवीगार चवळी, टपोऱ्या शेंगा , दळदार मका खाऊन रिफ्रेश झालेल्या मुलांकडे बाईंशी गप्पा मारायला भरपुर विषय असतात ... भरभरून बोलतात मुलं, आपण फक्त शांतपणे ऐकायचे आणि कोवळ्या कळ्यांच्या मनातले निरागस भाव टिपायचे ! ब्रम्हानंद म्हणतात तो हाच की , तशातल्या त्या गराड्यातून माझ्या अलीम नावाच्या विद्यार्थ्याने माझ्यासमोर एक आगपेटी धरली आणि मोठ्या उत्साहाने म्हणाला, बाई मी न् तुमच्यासाठी गंमत आणलीय बघा ! मी त्या आगपेटीकडे बघून म्हणाले , ''अरे, अलीम यात कसली रे आलीय गंमत? आगपेटी पाहिलीय मी !'' मी हे म्हणताच केवढा हशा पिकला वर्गात .. तोच गाल फुगवुन म्हणतो कसा? ''अहो उघडून तर बघा आहे की नाही गंमत ती ?मी म्हणाले अरेच्चा असय होय! .. बघू तर?'' मी ती आगपेटी उघडली तर त्या आगपेटीत आगपेटीत मावेल एवढा दोन इंचाचा एक मोरपंखी निळसर रंगाचा किडा अगदी शांत पहुडला होता सुरवातीला मी दचकलेच अरे ! हे काय ?मी दचकलेले पाहुन कोण आनंद झाला त्याला... त्याने त्याच्या भाषेत त्या किटकाचे नाव भिंगोटा असे सांगितले. माझ्या मनाचे कुतुहल जागृत झाले मी त्याला बरेच प्रश्न विचारले कुठे सापडला तुला हा किडा ? तू कसे पकडलेस याला ? आणि का पकडले ? तुला भिती नाही का वाटली ? अगदी निर्भयपणे त्याने माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली .... आम्ही सर्वजण पकडतो हे किडे आणि बाई हा किडा जवळ बाळगला ना तर आपल्याला खू..... प पैसे मिळतात आपण श्रीमंत होतो .. तुमच्यासाठीसुद्धा मी आणून देईन हा भिंगोटा .... अलीम व्यक्त होत होता ... सारा वर्ग कुतुहलाने अलीमकडे पाहत होता .. त्याचे बोलणे मी शांतपणे ऐकून घेतले खरे पण माझ्या मनात चलबिचल सुरू झाली . अशांत अस्वस्थ वाटायला लागले अगदी .... खू.... प पैसे मिळतात , श्रीमंत होतो आपण ! हे वाक्य सारखे मनात पिंगा घालु लागले क्षणभर वाटले त्याला

रागवावे .. पण वयाने लहान होता रागावल्याने प्रश्न सुटणार नाही. अलीमला मी जागेवर बस म्हणून सांगितले.. किडा सोबत बाळगल्याने पैसा मिळतो ... म्हणजे मुलांच्या मनात कुठेतरी अंधश्रद्धा आहे .. आणि वेळावेळी मुक्या प्राण्यावर दया करा हे सांगुन, भिंतीवर सुवचने लिहुनही त्या किटकाबाबत मुलांनी हिंसकपणे त्याला डांबून ठेवले होते ही गोष्ट मनाला बोचली. अंधश्रध्देचे बीज मुलांच्या मनात रूजण्या आधीच त्याला काढुन फेकायला हवे याची मला जाणीव झाली.... मी काय करता येईल याचा विचार करू लागले .... कोणत्याही समस्येवर शांतपणे विचार केला की मार्ग सापडतो तसा मलाही एक कल्पना सुचली . मधल्या सुटीनंतर गणिताच्या तासिकेला कृतीयुक्त पध्दतीने भागाकार शिकलो आणि पेटीतले सर्व साहित्य मी मुलांकडून बाहेर काढून घेतले , पेटी रिकामी झाली . प्रश्नार्थक नजरेनं मुलं माझ्याकडे पाहु लागली कारण रोज जो अध्ययन घटक शिकतो तेवढच साहित्य बाहेर काढायचं .. आणि परत ठेवायचं असा तर बाईंचाच दंडक ना ?मुलं गोंधळल्या नजरेनं पाहु लागली माझ्याकडे ... अरे आपल्याला ये न् एक गंमत करायचीय आज . गंमत म्हणताच उड्या , आरडाओरडा सुरू झाला. वर्गात कृतीतून शिकणं आवडतं मुलांना म्हणुन तो आरडाओरडा सुद्धा सुखद वाटतो मला.... तेवढयात त्या गलक्यातून बाई काय गंमत दाखवणार आज ?असा प्रश्न आला .. मी वर्गाला शांत केले अलीमला पुढे बोलावले आणि विचारले बघ बाळा ही काय आहे ? पेटी आहे बाई ...... बरं समजा मी तुला सांगीतले या रिकाम्या पेटीत तुला काही वेळ पडून रहायचय , कसलाही आवाज न करता फक्त पडून रहायचे तू आत गेल्यावर आम्ही ही पेटी बंद करणार . तर .... माझे बोलणे पुर्ण होते न होते तेवढयात दोन पाऊल मागे सरकून म्हणतो कसा छे ! छे ! मी नाही बुवा जाणार या पेटीत .मी म्हणाले अरे कल्पना तर करून पहा या पेटीत तुला कोंडले तर ..... आपण नाही का निबंध लिहित मी पक्षी झालो तर , मी फुलपाखरू झालो तर तसे तुला या पेटीत कोंडले तर ? सांग .अलीम काहिसा विचारात पडला हं.... म्हणत विचार करू लागला वर्गात अगदी शांतता पसरली ... तुला पेटीत गेल्यावर कसे वाटेल ? तुला भिती वाटेल का ? माझ्या या प्रश्नांनी त्याच्या विचारांना बहुधा चालना मिळाली असावी तो म्हणाला बाई ! पेटीत किती अंधार राहिल ? मला एकटे वाटेल .... भिती वाटेल मला , श्वास सुद्धा घेता येणार नाही , आणि मला तहान लागली भूक लागली तर मी काय करणार नको बाबा मला तर विचार करूनच अंगावर काटा येतोय. एकदा माझी आई मी झोपलेला असतांना घर बंद करून शेजारी गेली आणि नंतर मला काही वेळानं जाग आली तेव्हा घरात कोणी नाही हे पाहून किती घाबरलो होतो मी . आई आई म्हणून ओरडत अर्धा गाव गोळा केला होता अगदी. आता मला माझा मुद्दा मांडण्यासाठी अगदी योग्य संधी होती समोर बसलेल्या मुलांसमोर मी तो भिंगोटा असलेली आगपेटी धरली आणि म्हणाले बघ अलीम आणि मुलांनो नुसत्या रिकाम्या पेटीत जा म्हटल्याबरोबर अलीम घाबरला.... एकटं कोंडून घेण्याच्या विचारानं किती बिथरला . त्याला काय वाटेल हे त्याने शब्दांतुन आपल्याला सांगितले. मग मला सांगा या भिंगोट्याची अवस्था काय असेल ? त्याला नसेल का भिती वाटत ? त्याला नसेल का तहान भूक लागत ? त्याला नसेल का आईची आठवण येत ? त्याचा नसेल का श्वास गुदमरत ? असे कितीतरी प्रश्न विचारून मी मुलांना चिंतनापर्यंत आणले. मुलं पुन्हा पुन्हा त्या किटकाकडे त्या पेटीकडे आलटून पालटून पाहू लागले. शेवटी मी म्हणाली आणि मुलांनो अलीम ला बोलता येतय म्हणून तो त्याला काय वाटेल हे सांगू शकला या ... भिंगोट्याला सांगता येईल का रे त्याला काय वाटतय ? माझ्या या सर्व प्रश्नांनी अलिमसह सर्व मुलं गंभीर झाली काय योग्य –काय अयोग्य हे आपसुकच उमगली त्या किड्याला सोडून द्या असे मी न सांगता देखील त्यांच्या दप्तरातून ७ ते१० आगपेटया निघाल्या त्या हातात घेऊन शाळेमागच्या शेताकडे मुलं अधीर होऊन पळत सुटली..... परत आली म्हणाली बाई आम्ही त्याला मुक्त केले कधीच न कोंडून ठेवण्यासाठी ..... किती बरे वाटले मला मग मी हळूच विचारले कोंडलेला किडा ( भिंगोटा ) आपल्याला पैसे देऊ शकतो का ? तेव्हा हसतच स्वतःच्या डोक्यावर टपली मारत मुलं काय ते समजली अन् नाही म्हणाली..... माझा प्रयोग यशस्वी झाला किती किती बरं वाटलं म्हणून सांगू .एका छोट्याशा कृतीतुन मुलांमध्ये कृतीशीलता , संवेदनशिलता , दयाभाव, परोपकार , वैज्ञानिक दृष्टीकोण , निसर्गाशी मैत्रभाव अशी कितीतरी मुल्य रूजवण्याचा मी आज प्रयत्न केला होता .

आजचा हा अनुभव गाठीशी घेऊन मी पुन्हा नव्या अनुभवासह माझ्या या पाड्यावरच्या मस्तीच्या पाठशाळेत जाण्यास नव्या दमाने तयार झालेय !



# इंग्रजीत बोलू काही...

**विजय मधुकर मोंढे**
जि.प.उच्च प्राथ.शाळा लोणी काळे
ता.मेहकर जि.बुलढाणा
९०११३३२६०८

प्रत्येक मूल शिकलं पाहिजे या उदात्त हेतूने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र 'हा कार्यक्रम महाराष्ट्रात सुरू झाला. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या शिकण्याच्या वेगानुसार शिकवलं जात असताना बऱ्याच इंग्लिश मीडियम स्कूल मधून विद्यार्थी मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये दाखल झाले. इंग्रजी विषयाचे आकर्षण आज आपण सर्वच ठिकाणी अनुभवतो आहे. पालकांमध्ये सुद्धा या इंग्रजी विषयाचे आकर्षण असल्यामुळे बऱ्याचशा पालकांनी आपली मुलं इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये दाखल केली होती परंतु प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमाच्या यशस्वीतेने ही मुले मराठी माध्यमांच्या शाळेमध्ये विशेषतः जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये दाखल झाली. त्यामुळे या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेमध्ये संभाषण करता यावे, त्यांच्यामध्ये असलेली इंग्रजी विषयाची भीती दूर व्हावी आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढीस लागावा यासाठी स्पोकन इंग्लिश हा एक नवीन उपक्रम सुरू केला गेला.अध्ययन अध्यापन करत असताना अध्ययनकर्त्यांकडून झालेल्या चुका आपण स्वीकारल्या पाहिजे. त्या स्वीकारून नंतर हळूहळू त्याच्यामध्ये आपण सुधारणा केली पाहिजे असे तज्ञांचे मत आहे. अगदी शिकण्याच्या पहिल्या पातळीवरच आपण त्याला प्रत्येक वेळी बरोबर करत बसलो, त्याच्या चुका दाखवत बसलो तर त्या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ शकतो आणि म्हणूनच विद्यार्थ्यांच्या चुका झाल्या तरी त्यांना इंग्लिश बोलण्यासाठी आपण प्रयुक्त केले पाहिजे.अगोदर fluency आणि नंतर accuracy या तत्त्वानुसार चालणारा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य असा आहे.औरंगाबाद येथील SIEM( state institute of English management) ही संस्था या विद्यार्थ्यांच्या स्पोकन इंग्लिश विषयाच्या अध्ययन-अध्यापन बद्दल सतत नवनवीन तंत्रे शोधत असते. शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असणाऱ्या तज्ञ व्यक्तींना बोलावून त्या ठिकाणी ग्रामीण भागातील मुलांना सुसंगत ठरेल अशी या अभ्यासक्रमाची निर्मिती केल्या जाते.


विद्यार्थ्यांवर त्यांचे प्रयोग करून या अभ्यासक्रमाला समृद्ध केले जाते. कोणतीही भाषा शिकण्याची चार टप्पे असतात. श्रवण ,भाषण ,वाचन आणि लेखन या चार टप्प्यानुसार जर भाषा शिकली गेली तर तिचे दृढीकरण चांगल्याप्रकारे होते असे भाषा विषयातील तज्ञांचे मत आहे. परंतु अगदी नवीन दाखल झालेल्या मुलांना सुद्धा एकदम इंग्रजी भाषेच्या चौथ्या टप्प्यातील लेखन प्रकारांमध्ये लेखन करायला लावणे संयुक्तिक ठरत नाही. याच मुद्द्याला न्याय देऊन विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त इंग्रजी भाषा ऐकायला मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इंग्रजी ही परकीय भाषा असल्यामुळे तिचे श्रवण विद्यार्थ्यांना जास्त प्रमाणात होत नाही म्हणून इंग्रजी विषयाच्या संदर्भात पालकांची भूमिका देखील महत्त्वाची ठरते .शाळेतील काही मिनिटांच्या

तासिकेमध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजी ऐकायला मिळते परंतु घरातील वातावरणामध्ये इंग्रजी ऐकायला मिळेलच असे नाही म्हणूनच पालकांनीसुद्धा जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांना काही टीव्ही , युट्युब, इंटरनेट सारख्या माध्यमातून इंग्रजी श्रवणाला चालना दिली पाहिजे.दैनंदिन वापरातील अनेक शब्दांचा योग्य समन्वय साधून छोटी छोटी वाक्ये तयार करून विद्यार्थी इंग्रजी बोलायला

लागतात तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढायला सुरुवात होते. शिकण्याच्या या सुरुवातीच्या प्रक्रियेमध्ये त्यांना प्रोत्साहन मिळणं अत्यंत आवश्यक असतं.त्यांच्या इंग्रजी शब्दांच्या उच्चारा मध्ये चुका होऊ शकतात परंतु त्या चुका आपण स्वीकारल्या पाहिजे आणि नंतर त्यांना हळूहळू बरोबर केलं पाहिजे. बऱ्याच प्रेक्षणीय ठिकाणी गेल्यानंतर आपणाला अगदी छोट्या वयातील गाईड मिळतात. प्रेक्षणीय स्थळांची माहिती ते अस्खलितपणे इंग्रजीमध्ये देत असतात त्यांचे शिक्षण तेवढे झालेले नसते परंतु सराव आणि दैनंदिन वापर यामुळे त्यांच्या बोलण्यामध्ये जी काही षर्थ्रीशपलू येते ती आपल्या सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये आणता येईल अशा प्रकारचा दृढविश्वास SIEM औरंगाबाद यांचा आहे.

स्पोकन इंग्लिश प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनेक शिक्षकांनी या प्रशिक्षणाची मागणी केल्यानंतर हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. महाराष्ट्रातील कृतिप्रवण शिक्षकांनी हा प्रकल्प आपल्या वर्गांमध्ये राबविल्यानंतर त्याची फलश्रुती अतिशय छान आहे.विद्यार्थ्यांना बोलण्यासाठी पोषक असं वातावरण तयार केलं जातं, त्यांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. चर्चा, चित्र सादरीकरण, स्वतःचे मत मांडणे ,एखाद्या वस्तूचे वर्णन करणे, विशेषणांचा वापर, शब्द भेंड्या, अंताक्षरी, कृतियुक्त गीते यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बोलण्यासाठी प्रयुक्त केल्या जाते.

महाराष्ट्रामध्ये सध्या तेजस हा प्रकल्प राबवला जात आहे .तेजस हा तीन वर्षाचा एक भागीदारी प्रकल्प महाराष्ट्र शासन ,टाटा ट्रस्ट आणि ब्रिटिश कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या मधला एक प्रोजेक्ट आहे. तेजस चा महत्त्वाचा भाग म्हणजे टीचर्स ऍक्टिव्हिटी ग्रुप. २०१६ मध्ये महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प सुरू करण्यात आला होता त्यांच्या यशस्वी तो नंतर उर्वरित २७ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे. जवळपास १८०० ऍक्टिव्हिटी ग्रुप तयार करण्यात आलेले असून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत इंग्रजी भाषेचे अद्यावत ज्ञान पोहोचवल्या जात आहे.वर्गामध्ये आत्मविश्वासाने इंग्रजीमध्ये संभाषण करता यावे, आपल्या दैनंदिन अध्यापनामध्ये नवनवीन तंत्रांचा वापर करता यावा ,तुमच्या स्वतःचे अनुभव इतरांसाठी फायदेशीर ठरावेत म्हणून आपल्या इथं आपल्या अनुभवांचे सादरीकरण आपल्याला त्या ठिकाणी करता येतं .वर्गात मध्ये येणाऱ्या विविध समस्यावर तोडगा काढण्यासाठी त्याचा उपयोग होताना दिसत आहे.त्याचबरोबर स्वतःच्या व्यावसायिक विकासामध्ये सुद्धा त्याचा हातभार लागताना आपल्याला दिसून येते. अशा बहुआयामी या प्रकल्पातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजीत बोलू काही अशी प्रेरणा नक्कीच मिळेल हीच आशा बाळगूया ...




**मोहिदा ता.शिरपूर जि.धुळे येथील उपशिक्षक श्री.उमाकांत गुरव यांच्या शैक्षणिक संघटनात्मक व सामाजिक कार्याची दखल घेवून विभाग स्तरीय शिक्षण तपस्वी पुरस्काराने सन्मान....**




**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक –शैला नंदकिशोर हजारे **Reg No. MAHMAR2015/67226**



# हरवलेल-गवसलेलं !

**गिरी श्यामसुरेश गुमानगिरी**
जि.प.प्रशाला अंबुलगा (बु.)
ता.निलंगा जि.लातूर
९९२३०६०१२८

कालचा शिक्षक आणि आजचा शिक्षक यात एक स्पष्ट फरक जाणवतो. छडी लागे छम छम चा वापर करणारा कालचा शिक्षक तर समुपदेशकाच्या भूमिकेतून छडीला हद्दपार व कालबाह्य केलेला आजचा मदतनीसाची भूमिका बजावणारा तंत्रस्नेही गुरूजी. ज्ञान,प्रेम,शक्तीचा वापर करून विद्यार्थी घडवणारा कालचा शिक्षक. समर्पण, त्याग, देशभक्ती, साधा, सरळ,प्रेमळ कमी पगारावर  किंवा अल्प मानधनावर काम करणारा गुरूजी माणूस. त्याच्या गरजा कमी पण ज्ञान मात्र अस्सल. सातासमुद्रपार त्याच्या ज्ञानाची जादू पसरलेली. निसर्गाच्या माध्यमातून जीवन शिक्षण देणे हा त्याच्या जीवनाचा मंत्रच अणजू अनेक विषयांचे ज्ञान त्याने मोठ्या कष्टाने कमवलेले कालच्या गुरूजींचे जगणे १००% मुल्यांवर आधारित पगाराकरीता नौकरी न करता सेवाव्रत म्हणून शिक्षकीपेशा त्यांनी स्विकारलेला.

स्वातंत्र्यानंतर २१ व्या शतकातील शिक्षक हा तंत्रज्ञानाला सोबत घेऊन चालणारा. जीवन विद्येबरोबरचं त्याने कौशल्याला महत्त्व दिलेले. पोपटपंची पेक्षा आकलनावर म्हणजे समजपूर्वक शिक्षणावर त्यांचा भर. धोतर टोपी सोडून पारंपारिक पोषाखापेक्षा शर्ट, पँट  कार्पोरेट लुकवर त्यांचा अधिक भर मातृभाषेबरोबरचं इंग्रजी भाषेचे महत्त्व त्यांनी ओळखलेले. तंत्रज्ञान शिक्षणाकडे त्याचा कल अधिक परंतु पर्यावरण शिक्षणाकडे थोडासा विन्मुख झालेला. वर्गात आपण शिकविण्यापेक्षा मुलांने स्वत: कसे शिकावे याकडे अधिक लक्ष देणारा भगीरथ. प्रकल्प, उपक्रम, प्रयोग, कृती, नवोपक्रम, संशोधनाकडे अधिक ओढा, आधुनिक जगाबरोबर त्याने स्वत:ला बदलून घेतलेले. वर्गात ई-लर्निंग शिक्षण व सर्वसमावेशा पद्धतीचा सुरू केलेला वापर. त्याचबरोबर टॅबद्वारे शिक्षण, डिजीटल माध्यमांचा वापर अधिक करणारा. खेळातून, कृतीतून आनंददायी शिक्षण पद्धतीतून मुलांचा सर्वांगीण विकास करणारा. ज्ञानसंरचना आधारीत विविध अभ्यासपद्धतीचा वापर शाळेच्या भींती बोलक्या करून सुसंवादावर आधारीत अभ्यास उपक्रमांचा वापर करणारा गुरूजी.

काळाप्रमाणे शिक्षण पद्धती बदलते. स्वातंत्र्यपूर्वीचा काळ हा इंग्रजांचा काळ होता. ब्रिटीशांना कारभार करण्यासाठी लेखनिका तयार करणारे शिक्षण देणे व याला अनुकुल शिक्षकांना भूमिका देण्यात आली. घोकपट्टीवर आधारीत शिक्षण व्यवस्था व क्षेत्रे विस्तारलेली होती. जसजशी ज्ञानाची क्षितिजे रूंदावतग गेली. आश्रम व्यवस्थेतून शिक्षणाने कात टाकली. विचारवंतांनी सर्वांचे शिक्षण अधोरेखित केले. जीवनासाठी लागणारे व व्यावसायिक गरजा पूर्ण करणारे शिक्षण व्यवस्था अस्तित्त्वात आली. अनौपचारिक वर्गातून औपचारिक स्वरूपाचे शिक्षण सुरू झाले. वेतन आयोग स्थापन करण्यात आला. शंभर-दोनशे रूपये मानधनावर काम करणारा गुरूजी हजारो रूपयाच्या पगाराचा धनी झाला. सायकलवरचा गुरूजी, क्रमश: मोटार सायकलवरून नंतर कारमधून सुसाट वेगात धावतोय. अक्षरश: घडयाळाचा व यंत्रांचा गुलाम झालाय. खेड्याकडून शहरात तो जाऊन राहिला आहे. कालचा गुरूजी अध्यात्मवादी तर आजचा शिक्षक भौतिकवादावर विश्वास ठेवणारा भौतिक जगात गुंतून गेला आहे. ताण-

तणावातून मधुमेहाबरोबरचं अनेक व्याधींचा धनी झाला आहे. आजचा शिक्षक ज्ञान कौशल्याने प्रगत तर प्रकृतीने व्याधीग्रस्त झाला आहे.

प्रगतीची नवनवीन शिखरे तो काबीज करीत आहे. तो विविध पुरस्कार प्राप्त करीत आहे. आजचा शिक्षक हा शासनाच्या विविध कार्यात गुंतला आहे. त्याला जनगणना, निवडणूका, बीएलओ, मध्यान्ह भोजन योजना, विविध टप्पे, प्रशिक्षणे यासारखी अनेक कामे करावी लागत आहेत. शाळाबाह्य कामात तो अधिक व्यस्त झाला आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणांना विरोध करणारा व प्रसंगी आंदोलन, उपोषणास बसणारा आजचा शिक्षक अधिक स्वाभिमानी, जाणणारा, उपक्रमशिल आहे. कालच्या शिक्षकापेक्षा आजचा शिक्षक स्वत:ला सतत अपडेट ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. नवीन बदल स्विकारून काळाप्रमाणे स्वत:ला तो बदलून घेत आहे. कालबाह्य गोष्टीचा त्याग करून स्वत:मध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्याची क्षमता आजच्या शिक्षकामध्ये आहे. प्रत्येक मुल शाळेत आले पाहिजे व ते टिकले पाहिजे त्याची सातत्याने गुणवत्ता वाढली पाहिजे याकडे आजच्या शिक्षकांचा कटाक्ष आहे. ग्रामीण भागातील शाळांची गुणवत्ता झपाट्याने वाढत आहे. आजचा गुरूजी बायोमॅट्रीक हजेरी घेतो आहे. आजचा गुरूजी काळाची बदलती आव्हाने स्विकारून स्वत:ला संघर्षयात्री तयार करू पहात आहे.

*बदलता प्रवाह ....*

# शिक्षण प्रक्रिया व शिक्षा

शाळा म्हणजे विद्यामंदिर तिच्या आदर सर्वच करतात. शिक्षणाच्या या मंदिरात ज्ञान अर्जन व शिक्षण प्राप्तीसाठी आपण मुलांना वयाचा तीन-चार वर्ष झाल्यावर बालवाडीपासून आणायला व पाठवायला सुरवात करतो. मुलांना उत्तम प्रकारचे दर्जेदार शिक्षण मिळणार म्हणून अध्यापक वर्ग व आपण खूप प्रयत्नशील असतात. शाळा व शिक्षणाची कास धरल्याने ज्ञान प्राप्ती करून मुलांचा बौद्धिक, शारीरिक तसेच विचारात्मक ज्ञानात वाढ होते. पुर्वी मुलांचा शैक्षणिक प्रक्रियेत मुलं शाळेत शिकत असत. त्यांनी काही खोडकर कृती केली, चुका केल्या, उणीदुनी काढल्या तर अध्यापक (गुरूजन) अश्या मुलांना शिक्षा करायचे व त्यांना शिस्त लावण्यासाठी कोंबडा बनवत, हाताने मारत दटावत तर कधी रागात टूक्कार, कामचुकार, गाढवा इत्यादी अपशब्द उच्चारत. आज अश्या बोलण्यावर, भाषाशैलीवर मनाई आहे. शाळेत शिक्षण प्रवाहात जोडण्याकरिता धाक धाखावत सक्ती करून त्यांना अभ्यासाकडे वळवायचे. त्यांच्या अभ्यासाला चालना द्यायचे.

कालांतराने समाजमन परिवर्तन होत गेले. स्थिती बदलली पालकांना आपल्या पाल्या बाबत असलेले अतिलाड, प्रेमभाव, सहानुभूती इत्यादी गोष्टींमुळे मुलांवर सक्ती न करता शिक्षकांनी विद्यार्थ्यात भय न निर्माण करता आवड हे गुण रूजवावे असे सांगण्यात येते. पालकांची ही अशीच भावना झाली आहे. शिक्षण प्रक्रियेत शाळेत मुलाला शिक्षा न करता त्याला स्वच्छेने अध्यानासाठी प्रेरितकरून शिक्षण प्राप्तीसाठी प्रोत्साहीत करत गुरूजनांनी अध्यापन करावे. यांच्या मुलांवर (विद्यार्थ्यांना) शिक्षा न करण्याने असा विपरीत परिणाम झाला आहे की मुले शिक्षक वर्गाला घाबरत नाही. त्यांच्या आदर, मान राखत नाही मुलांना कळले आहे की शिक्षक आपल्याला आता काही करणार नाही. अशी मुले धीट बनवून घरीही अभ्यासाकडे अधिक लक्ष न देता व शैक्षणिक प्रगतीट्रिपल एक्स गौतम बोलतोय अभ्यास नसल्यासारखे करून शैक्षणिक प्रगतीत अप्रगत राहू शकतात. आजच्या शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांना शिक्षा म्हणजे झाडांची रोपे यांना पाणी घालणे, इतर मुलांना मदत करणे, इतरांना साहय्यता करणे, शाळेतील शैक्षणिक साहित्य जागोजागी ठेवणे इत्यादी कामे शिक्षा रूपात दिली जातात. पालकांनी नियमित आपल्या मुलांना शाळेत पाठविले पाहिजे. गुरूजनांचा आदर मान राखायला पाल्याला सांगावे तसे संस्कार घरीही करावे. गुरूजनांचे आज्ञापालन करायला सांगावे. तसेच मुले घरी शाळेतून घरी आल्यावर त्यांना घरी अभ्यासाला बसवावे. शिक्षकांनी शाळेत शिकवलेल्या भागावर उजळणी करून गृहपाठ करून घ्यावा, असे विविध स्वरूपातील शिक्षा देऊन वातावरण सौहादांचे करावे.



**शेख वसिम सुभान**
न.पा.शाळा क्रं.१२
ता.शहादा जि.नंदुरबार
९९२२१५८२१६



# हरवलेलं-गवसलेलं !

**चंद्रकांत बी.नेरकर**
जि.प.शाळा मोरवडगांव
ता.जि.धुळे
९४२३४०७२४८

गुरू ईश्वर तात माय, गुरूविन जगी थोर काय

आई-वडील, ईश्वर या सगळ्या प्रतिमा कोणामध्ये पाहावयास मिळत असतील तर त्या गुरूमध्ये म्हणजेच सर्वश्रेष्ठ गुरू आहेत. कारण गुरू आपणाजवळचे सर्व ज्ञान शिष्याला देत असतात. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात.

तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी तैसे तुम्ही जगी संतजन । गुरूजन. चंदन ज्याप्रमाणे आपला सुगंध इतरांना देवून आपल्या पात्रतेचे बनवतात त्याचप्रमाणे गुरू आपल्या शिष्यांना बनवतात.

पूर्वीच्या काळी गुरूकूल पद्धती अस्तित्वात होती. गुरूच्या घरी राहून त्यांची सर्व कामे करून विद्या संपादन करायची. विद्याभ्यास पूर्ण केल्यानंतर शिष्य गुरूदक्षिणा देत असत. कालांतराने रविंद्रनाथांच्या शांतीवन सारख्या निसर्ग शाळा सुरू झाल्या. त्यावेळचे शिक्षण म्हणजे पावकी, निमकी, दिडकी, अडीचकी आणि याद्वारे तोंडी हिशोब. पुस्तक वाचण्यासाठी बाराखडी तोंडपाठ करून घेतली जाई. नंतर इंग्रज आले. त्यांनी राज्यकारभाराच्या सोईसाठी शाळा काढल्या. बालवाडी ते ४ थी पर्यंत शिक्षण गावातच होई. ४ थी पास झालेले विद्यार्थी शिक्षक म्हणून नोकरीस लागत असत. गुरूजी ज्या गावात नोकरीस असत, तिथेच वास्तव्यास असत. त्यामुळे गावकऱ्यांच्या सुख दुःखात समरस होत. गावातील लोकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. गुरूजींचा पोशाख एकदम साधा पांढरे शुभ्र धोतर, पांढरा नेहरू शर्ट, डोक्यावर टोपी गावात गुरूजींना मान असे. लग्न जमवण्यापासून ते चावडीवरील भांडण मिटविण्यापर्यंत गुरूजींना मान दिला जाई. गुरूजी जे सांगतील ती पुर्वदिशा. गुरूजींच्या शाळेत जायच्या वेळेवर लोक किती वाजले ते सांगत. म्हणजेच वक्तशीरपणा हा गुण पूर्वीच्या गुरूजीकडून घेण्यासारखा होता. शिस्त तर वाखाणण्याजोगी होती. गुरूजी रस्त्यात दिसले तरी मुले घाबरायची म्हणजे गुरूविषयी आदरयुक्त भीती होती. स्पर्धा एवढ्या वाढलेल्या नव्हत्या, पाठांतरावर भर होता. अभ्यास केला नाही तर हातावर छड्या भेटायच्या. उठाबशा काढायला लागत. पण तरीही पालक भांडायला येत नसत.

काळाच्या प्रवाहामध्ये गुरूजी हे नाव बदलून मास्तर, शिक्षक आणि आता सर नावाप्रमाणे भूमिकेतही बदल झाला. शिक्षक म्हणजे-शि-शिलवंत, क्ष-क्षमाशील, क-म्हणजे कर्तव्यदक्ष इतके सुंदर जर आपले नामकरण असेल तर जागा ना त्या नावाला. मला येथे आवर्जून सांगावे वाटते की, सर्वच शिक्षक असे नाहीत फक्त बोटावर मोजण्या इतकेच शिक्षक आपल्या कर्तव्यात कसुर करतांना दिसतात. त्यामुळे समाजात शिक्षकाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे.

संगणकाच्या युगात शिक्षकाकडे पाहण्याचा दृष्टीकोन विद्यार्थ्यांमधील शिस्तीचा अभाव खाजगी क्लास व ट्युशनमुळे शिक्षकप्रती कमी झालेला आदरभाव या सारखे प्रश्न आजच्या शिक्षकांना भेडसावत आहेत. आजच्या शिक्षकासोबत आंधळी कोशिंबीर खेळणारे शासन निर्णय शिक्षकाला शिक्षक म्हणून सेवा करण्याऐवजी घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे देत असणाऱ्या वागणुकीमुळे शिक्षक काल आणि आज हा भेद मांडावा लागतोय हीच खरी शिक्षक या घटकाची शोकांतिका आहे. अखेरीस कालच्या नि आजच्या शिक्षकांबद्दल मला म्हणावेसे वाटते,

'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती'

या दृष्टीने शिक्षक बांधव तळागाळातील विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यासाठी ज्ञानरचनावादी दृष्टीकोन घेवून पुढे चालला आहे. निश्चितच तो आपला विद्यार्थी २१ व्या शतकाच्या स्पर्धेत समर्थपणे तोंड देण्यास तयार करील यात शंका नाही. शेवटी एवढेच म्हणेल-

ज्ञपणती जपून ठेवा, अंधार फार झाला'



# हरवलेलं-गवसलेलं !

**नितीन धर्मराज पाटील**
आदर्श माध्य.विद्या मंदिर
ता.जि.धुळे
९३२३१४१३८२

जेव्हा आपला भारत देश स्वतंत्र झाला तेव्हा डॉ . सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे उपराष्ट्रपती होते .एवढेच नव्हे तर रूस मध्ये भारताचे राजदूत म्हणून त्यांनी भूमिका पार पाडली होती . सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिवस होता तो दिवस आपण ‘ शिक्षक दिन’ म्हणून साजरा करतो. त्यांनी एकदा आपल्या भाषणात सांगितले की शिक्षकांचे जीवन किती महान व नास्तिक आहे .विद्यार्थी मित्रांनो शिक्षक हे असं उपकरण आहे की ज्यांच्या मुळे भले भले युगपुरूष , महापुरुष घडले हे आपले दुसरे गुरु आहेत व (प्रथम )आई . गुरूजींचा नेहमी आदर मान ठेवला पाहिजे. त्यांना नेहमी मान दिला पाहिजे कारण समाजात घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असतो . हेच शिक्षकदिनी विशेषत्व आहे .

वाढीव अनुदेशन तंत्रज्ञान –लेखन संप्रेषण नोंदी ठेवण्यासाठी पूर्वीपेक्षा वर्ग , शाळा आणि विद्यार्थ्यांमधे संगणकाचा आधिक वापर होतो . तंत्रज्ञानाने विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सारखे नवीन मार्ग तयार केले आहेत . हे शिक्षक प्रभावीपणे शिकवू लागले आहेत.

शिक्षणामध्ये मोठी जबाबदारी असलेले समाज आणि शिक्षक दोघेही शिकणे आणि चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाचे मूल्यांकन करणे यावर भूतकाळापेक्षा जास्त लक्ष देतात . त्यामुळे लोकांपर्यंत शिक्षणाचे महत्त्व वाढले आहे आणि काही विद्यार्थ्यांसाठी शिक्षणामध्ये सुधारणा झाली आहे .परंतु या मुळे शिक्षक काय शिकवतात व विद्यार्थी काय शिकतात यावरही नवीन अडचणी निर्माण झाल्या आहेत . शिक्षकांची व्यावसायिक ता वाढली – आता शिक्षक नेहमीच त्यांच्या स्वतःच्या कामाच्या तसेच सहकार्यांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करु शकतात आणि आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करण्यासाठी पावले उचलण्यास सक्षम आहेत . व्यावसायिकतेमुळे अध्यापनात जास्त सुधारणा होते ;परंतु विशिष्ट शिक्ष क आणि शाळा पुरेशी चांगली आहेत की नाहीत याबद्दल जास्त चिंता निर्माण करते .

हे बदल शिक्षक कोठे शिकवतात यावर अवलंबून आहेत . शाळा , शहरे आणि संपूर्ण समाजात परिस्थिती भिन्न आहे . वर्गातील जीवनावरील ट्रेंडच्या परिणामांविषयी काही संकेत सापडतात , उत्तर अमेरिकेत होणारे बदल. विद्यार्थी अर्थातच नेहमीच वैविध्यपूर्ण असतात. ते भूतकाळात व वर्तमानकाळात अद्वितीय वेगात शिकतात अद्वितीय व्यक्तीमत्व दर्शवितात आणि स्वतःच्या मार्गाने शिकतात. अलिकडच्या दशकात विविधतेचे प्रकार व विस्तार वाढले आहेत. आता पूर्वीपेक्षा शिक्षक जास्तीच्या भाषांचा वापर करतात. भाषेच्या विवीधतेचा विचार केल्यास विवीध श्रेणी स्तर विषयांच्या नियमित वर्गखोल्यांमध्ये होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शिक्षकांनी अभ्यासक्रमाच्या मूख्य ध्येयांचा मागोवा ठेवणे आवश्यक आहे. बऱ्याच शिक्षकांसाठी तंत्रज्ञान म्हणजे संगणक आणि इंटरनेट शिकवणे आणि शिकवण्यासाठी संसाधन म्हणून वापरणे सुरू आहे. या साधनांमुळे विद्यार्थीना उपलब्ध असलेल्या माहितीची संख्या आणि श्रेणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे . तरी अलिकडच्या वर्षात शिक्षक आणि विद्यार्थी जबाबदार असतील अशी अपेक्षा जनतेने आणि वाढत्या प्रमाणाते केली आहे. उत्तरदायित्वाकडे कल वाढल्यामुळे शिक्षक म्हणून प्रमाणिक राहण्याची कायदेशिर आवश्यकता वाढली आहे. शिक्षकांची व्यावसायिकता वाढली – बहुतेक पारिभाषांनुसार एखादा व्यवसाय हा एक व्यवसाय आहे . जर त्याचे सदस्य त्यांच्या कामाच्या गुणवत्तेची वैयक्तीक जबाबदारी घेत असतील तर एकमेकांना त्यांच्या गुणवत्तेसाठी जबाबदार धरतील भूतकाळापेक्षा अध्यापन नक्कीच अधिक व्यावसायिक झाले आहे . शिक्षक देखिल विशेष वेळ आणि मेहनत घेतात.

# हाजिर तो वजीर



**श्रीकांत दिलीप अहिरे**
जि.प.प्राथ.शाळा,कोकणगांव
ता.साक्री जि.धुळे
७५८८७३६४८६



निराकार मनाला घडवते शाळा
जीवनास योग्य दिशा देते शाळा
ज्ञानकण वेचण्यास्तव जिथे चिमुकले होती गोळा
तिमिराकडून तेजाकडे नेते ती शाळा

नैतिकता, सुसंस्कार, सुशिक्षितपणा, सर्वगुणसंपन्नता सर्व काही शाळेतच मिळते ना? हो पण भौतिक सुविधांचा अभाव, शैक्षणिक मागासलेपणा, दुर्गम ग्रामीण भाग, ज्ञानापेक्षा शाळेत भात मिळतो म्हणून जायचे ही परिस्थितीने निर्माण केलेली आशा या सर्व बाबींमुळे शालेय शिक्षण म्हणजे जीवनशिक्षण ही व्याख्या कधी कधी असंबद्ध वाटते.

मी जि.प.प्राथ. शाळा कोकणगांव, येथे दि.१५/६/२००९ रोजी रुजू झालो.

आदिवासी भागातील दुर्गमक्षेत्रातील इ.१ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग असणारी शाळा. जेमतेम उपस्थित असणारा पट, अशिक्षित पालक वर्ग आणि मोडकळीस आलेली शाळा पाहून माझी ध्येयशक्ती सुद्धा मोडकळीस आली. मी पहिल्याच दिवशी नाऊमेद झालो.

पण क्षणार्धात मनात विचार आला. हीच वेळ आहे स्वत:ला सिद्ध करण्याची परिस्थिती कधीच संकट बनत नसते संकट तेव्हा बनते जेव्हा परिस्थिती हाताळता येत नाही. आणि मी ठरवलं आधी आपण बदलायचे मग शाळा बदलणारच. माझ्या समोर सर्वात मोठा प्रश्न होता विद्यार्थ्यांचा उपस्थितीचा? कारण शाळेत गळतीचे प्रमाण अधिक होते. मुलांची १००% उपस्थिती शाळेत रहावी याकरीता मी एक उपक्रम राबवायचे ठरवले.

उपक्रमाचे नांव :''हाजिर तो वजीर''

आपल्या कामाचे गुरूजनांनी कौतुक करावे ही प्रत्येक विद्यार्थ्याची सुप्त इच्छा असते. हाच धागा पकडून हा उपक्रम राबवण्याची सुपिक कल्पना सुचली.

प्रथमत: प्रत्येक विद्यार्थ्यांचे नांव, हजेरी क्रमांक,जन्म तारीख, आधार नंबर, फोटो, शाळेचे नांव अशी छानदार पाटी (कार्ड) बनवली. जो विद्यार्थी शाळेत इयत्तेनुसार सर्वात आधी येईल त्यांच्या नावाची पाटी दिवसभर शाळेच्या दर्शनी भागात लावायची. जेणेकरून शाळेतील सर्व मुले मुली येणारे पालक सर्वजण त्या मुलाचे कौतुक-अभिनंदन करायचे. इतर सर्व मुलांना ईर्षा निर्माण झाली. परिपाठाच्या वेळी सर्वासमक्ष त्या मुलांचे अभिनंदन केले. परत हे विद्यार्थी कधीही शाळेला उशिरा आले नाहीत.

आपण शाळेचे जबाबदार घटक असल्याची जाणीव हळूहळू प्रत्येक विद्यार्थी विद्यार्थीनीस होऊ लागली. पाहता पाहता शाळेचे १००% उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य झाले.

आनंददायी शिक्षण प्रवासात विद्यार्थ्यांना जिव्हाळा आपुलकी प्रेम या संवेदना कळू लागल्या. शाळा भरतांना वाजणारी घंटा त्यांना सुश्राव्य सुखद सुपरिचित वाटू लागली.

सुरूवातीला शाळेकडे निघायला जड वाटणारे पाय आता शाळा सुटल्यावरही शाळेतच रेंगाळतांना पाहिले की वाटते.

घर आणि शाळेत अंतर कधीच नसतं आपलेपणाची जाणीव देणारं. शाळा नावाच एक घर असतं.

# वृक्ष संवर्धनाच्या दिशेने...



**योगेंद्र नाटूसिंग गिरासे**
पां.बा.मा.म्यु.हायस्कूल शिरपूर
जि.धुळे
९४२२२३३३६६



संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात वृक्षांचे महत्त्व सांगताना म्हटलेच आहे की-

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ,पक्षीही सुस्वरे आळविती!!

या दृष्टीकोनाची आज खूप गरज आहे. कारण पर्यावरणीय दृष्टिकोनातून देशाच्या क्षेत्रफळाच्या ते ३० टक्के प्रदेश हा वनांनी आच्छादलेला पाहिजे पण हेच प्रमाण आज भारतात केवळ १७ टक्के शिल्लक आहे. याचा परिणाम म्हणून दुष्काळ ,अनियमित पाऊस, तापमान वाढ यासारख्या समस्या निर्माण झाले आहेत. हिंदीत म्हटलं जातं 'जैसी करणी वैसी भरणी' म्हणून आज आपण केलेल्या पापाची शिक्षा आज आपल्याला भोगावी लागत आहे. ही समस्या यापेक्षाही भयानक होऊ नये यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे वृक्ष लावणे गरजेचे आहे.

एकदा एका चिंचेच्या झाडावर एक कावळा ओरडत होता ते पाहून मनात विचार आला की हा कावळा हा संदेश देत असावा, 'काव -काव -काव, एक तरी झाड लाव!'

हा संदेश मनावर घेऊन माझ्या उपक्रमाला सुरुवात झाली.


शासन दरवर्षी पावसाला सुरुवात झाली, कि वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेते. कधी २ कोटी तर कधी ३३कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केला जातो पण हा संकल्प कागद ,फोटो किंवा बातमी पुरता मर्यादित राहतो .त्याची फलनिष्पत्ती अतिशय कमी प्रमाणात राहते .झाड लावण्यापेक्षा ते जगवणं खूप महत्वाचं असतं. यात झाडं लावली जातात पण त्यापैकी किती जगतात हा संशोधनाचा विषय ठरतो .यासाठीच शाश्वत वृक्ष लागवडी उपक्रम आमच्या पांडू बापु माळी म्युनिसिपल हायस्कूल शिरपूर येथे मी व आमच्या विद्यालयातील हरित सेना प्रमुख जयेश महाजन यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या वाढदिवशी वृक्ष लावून वाढदिवस साजरा करण्याचा उपक्रम हाती घेतला. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ यात सुरुवातीला जुलै महिन्यात मुलांना आवाहन करण्यात आले. परंतु रोपं महाग असल्याने या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी अतिशय कमी प्रमाणात प्रतिसाद दिला यावर उपाय म्हणून यावर्षी शैक्षणिक वर्ष २०१९-२० यात मुलांना विद्यालय व शिरपूर ग्रीन आर्मी च्या वतीने मोफत रुपये देण्यात आली व ती रोप विद्यार्थ्यांनी लावून फोटो व्हाट्सअपला शेअर करण्यास सांगितले .मुलांनीही आपले कर्तव्य समजून अंगण, शेत, शेताचा बांध, खळे, ओपन प्लेस येथे हि रोप लावली व ती जगवली .या उपक्रमाचा फायदा रोप लागली आणि ती जगली ,हेच या उपक्रमाचे यश सांगता येईल. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी आमच्या विद्यालयाने खारीचा वाटा उचलला याचा मला अभिमान वाटतो. रक्षाबंधनच्या दिवशी विद्यार्थिनींनी 'वृक्ष माझा भाऊ, रक्षण त्याचे करू 'हा संदेश देण्यासाठी तहसील कचेरीत ग्रीन आर्मीने लावलेल्या रोपांना राखी बांधून रक्षाबंधन साजरी केले. या उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एन व्ही जगताप, उपमुख्याध्यापक व्हि.डी. पवार, पर्यवेक्षक आर. आर. पाटील, जे.डी. गुरव, के. जी. वसुले व जितु भाऊ साहेब यांचे मार्गदर्शन लाभले.

या उपक्रमात शिरपूर ग्रीन आर्मी चे विशेष असे सहकार्य लाभले म्हणून ग्रीन आर्मी चे कार्य ही उजेडात आणावेसे वाटते .शिरपूर ग्रीन आर्मी ने शिरपूर तालुक्यात वृक्षलागवडीचा यज्ञ आपल्या हाती घेऊन दोन वर्षात जवळजवळ दोन हजारांवर वृक्षांची लागवड केली .तालुक्यातील आंबे, अनेर डॅम,

तहसील कचेरी, न्यायालय पोलीस, लाईन सीबीएसई शाळेजवळ रोपे लावली. दर रविवारी आपली सर्व कामे बाजूला ठेवून ग्रीन आर्मी चे सर्व सदस्य कोणाच्याही मदतीशिवाय आत्म प्रेरणेने श्रमदान करतात. ग्रीन आर्मी चे सदस्य धीरज देशमुख, धीरज राजपूत, धीरज पाटील, संभाजी पाटील ,गणेश पाटील बाबा चौधरी, मुन्ना राजपूत ,संदीप माळी चेतन चव्हाण ,प्रीतम पाटील ,राहुल पाटील, बकुल अग्निहोत्री व इतर सर्व सदस्यांच्या कार्याला मानाचा मुजरा करावासा वाटतो आणि अभिमानही वाटतो की मी या आर्मीच्या सदस्य असल्याचा शेवटी प्रत्येकाला एकच आव्हाने करावे असे वाटते झाडे लावा झाडे जगवा ,आपल्या पुढच्या पिढी करिता

*स्तुत्य संकल्पना....*

# चित्रगणेशाची स्थापना...



पर्यावरण रक्षणासाठी प्रदुषण रोखण्याची अत्यावश्यक गरज आहे. त्यासाठी प्लास्टिक, थर्माकॉल पासून होणारे प्रदुषण टाळले पाहिजे. त्याच बरोबर सध्या सुरु असलेल्या गणेशोत्सवासाठी बाजारात आलेल्या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमुर्तींमुळेही प्रदुषणात दरवर्षी वाढ होत असते. शाडू माती हा पर्यायही तेवढाच घातक आहे. कारण शाडू माती तयार करताना वापरलेल्या केमिकल्समुळे शाडू मातीचा थरसुद्धा साध्या मातीत एकरुप होत नाही. यासाठी गाळाची माती वापरुन गणेशमुर्ती तयार करणे हा पर्याय योग्य आहे.

पण विखरण ता. शिरपूर येथील साने गुरुजी तांत्रिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कलाशिक्षक प्रल्हाद डी. सोनार यांनी आपल्या घरी ब्लॅकबोर्डवर रंगीत खडूंच्या माध्यमातून 'श्री चित्रगणेश' चित्रित केले. सलग सात तास फलकलेखन करुन चित्र साकारले. रंगीत खडूंमुळे कोणतेही नुकसान होत नाही. शंभर टक्के प्रदुषण मुक्त गणरायाची निर्मिती करुन आपल्या घरी स्थापना केली आहे. यामुळे एक वेगळा मार्ग त्यांनी भाविकांसाठी दाखविलेला आहे.

आपणही आपल्या घरी फलकावर, कागदावर किंवा कापडावर असेच चित्रण करुन जर श्री गणेशाची स्थापना केली तर पर्यावरण सांभाळण्यासाठी प्रत्येकाची मदत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

– कलाशिक्षक : प्रल्हाद सोनार (९८२२६५१५५१)

Reg No. MAHMAR2015/67226

शिक्षण यात्री

Postal Registration No.DHL/557/2018-20

# एल्गार समस्त शिक्षक वर्गाचा...
# एकच मिशन जुनी पेन्शन....








प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..........................................................
..........................................................

Pragati Arts Shirpur 8421356261